सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. २८ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ११६ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# छत्रपती शिवाजी महाराजांनी अशक्य ते शक्य करून दाखवले : पंतप्रधान

नवी दिल्ली, २७ जुलै : युनेस्कोने मराठ्यांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. या किल्ल्यांपैकी प्रत्येक किल्ल्याशी इतिहासाचे एक पान जोडलेले आहे आणि येथील प्रत्येक दगड ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे. शत्रूंनी त्यांना रोखण्याचा खूप प्रयत्न केला, पण छत्रपती शिवाजी महाराजांनी अशक्य ते शक्य करून दाखवले, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी गौरवोद्गार काढले. 'मन की बात'च्या १२४ व्या भागातून मोदींनी देशवासियांशी संवाद साधला.

ते पुढे म्हणाले, गेल्या काही आठवड्यामध्ये क्रीडा क्षेत्र असो, विज्ञान असो अथवा संस्कृतीचे क्षेत्र असो, प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा, अशी कामगिरी अनेकांनी केली आहे. अलिकडेच शुभांशू शुक्ला हे अवकाशातून परतले, याविषयी संपूर्ण देशामध्ये खूप चर्चा झाली. शुभांशू सुरक्षित भूमीवर परतताच लोकांच्या हृदयामध्ये जणू एक आनंदाची लाट उसळली. संपूर्ण देशाला शुभांशू यांच्या कामगिरीविषयी अभिमान वाटला. अशावेळी मला एका घटनेचं स्मरण होत आहे. ज्यावेळी ऑगस्ट २०२३ मध्ये चंद्रयान-३ यशस्वीपणे चंद्राच्या पृष्ठभागावर



उतरले, त्यावेळीही देशामध्ये अशाच प्रकारचे अनोखे वातावरण तयार झाले होते. विज्ञानापासून ते अंतराळापर्यंतच्या विषयांमध्ये अगदी लहान-लहान मुलांमध्येही एक नवीन जिज्ञासा, उत्सुकता जागृत झाली होती. आता लहान-लहान मुलेही म्हणताहेत की, आम्हीही अंतराळामध्ये जाणार! आम्हीही चंद्रावर जाणार, अंतराळ संशोधक बनणार!

ऑगस्टचा महिना क्रांतीचा महिना आहे. १ ऑगस्टला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी असते, याच महिन्यात ८ ऑगस्टला गांधींजीच्या नेतृत्वाखाली 'भारत छोडो आंदोलना'चा प्रारंभ झाला होता. त्यानंतर १५ ऑगस्ट म्हणजे आपला स्वातंत्र्य दिवस येतो, त्यावेळी आपण आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या समर्पणाचं स्मरण करतो, त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेतो, परंतु मित्रांनो, आपल्या स्वातंत्र्याबरोबरच देशाचं विभाजन झालं, त्याचा सलही मनात कायम आहे. म्हणूनच आपण १४ ऑगस्ट रोजी 'विभाजन विभीषिका स्मृती दिवस' या स्वरूपामध्ये पाळतो.

वस्त्रोद्योग हे भारताचे फक्त एक क्षेत्र आहे असं नाही. हे आपल्या सांस्कृतिक वैविध्याचं उदाहरण आहे. आज वस्त्रोद्योग आणि तयार कपड्यांची बाजारपेठ खूप तेजीत आहे, आणि ही बाजारपेठ सातत्यानं वाढत आहे. या विकास मार्गातील सर्वात सुंदर गोष्ट अशी आहे की, गावांतील महिला, शहरांतील डिझाईनर, वयानं ज्येष्ठ असलेले विणकर आणि स्टार्ट-अप सुरू करणारे आमचे युवक, असे सर्वजण मिळून या प्रवासात पुढची वाटचाल करीत आहेत.

# थायलंड-कंबोडियात लवकरच युद्धविराम होऊ शकतो - ट्रम्प

## संघर्षात आतापर्यंत ३३ जणांचा मृत्यू, शेकडो जखमी

बँकॉक, २७ जुलै : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला की,थायलंड आणि कंबोडियाच्या नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर लवकरच दोन्ही देशांमध्ये युद्धविराम होऊ शकतो. ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथ सोशलवर लिहिले होते की, थायलंडचे कार्यवाहक पंतप्रधान फुमथम वेचायचाई आणि कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट लवकरच भेटतील आणि युद्ध थांबवण्याच्या दिशेने पावले उचलतील. मात्र, त्यांच्या विधानाच्या काही तासांतच सीमेवर पुन्हा गोळीबार सुरू झाला.

मीडिया रिपोर्टनुसार, रविवारी (२७ जुलै) पहाटे थायलंड आणि कंबोडियाच्या सीमेवर पुन्हा चकमकी सुरू झाल्या. सीमेपासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेल्या कंबोडियातील समरोंग शहरातही स्फोटांचे आवाज ऐकू आले. यावरून, दोन्ही देशांच्या सैन्याकडून किती जोरदार गोळीबार केला जात आहे, याचा अंदाज लावता येतो. ही घटना अशा वेळी घडत आहे, जेव्हा दोन्ही देशांमधील युद्धविरामासाठीआंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न केले जाताहेत. मात्र, रविवारच्या गोळीबारामुळे हे स्पष्ट झाले आहे की, तणाव अजूनही कायम आहे. दरम्यान, या संघर्षावर तोडगा काढण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेने थायलंड व कंबोडियाला शांततेचे आवाहन केले आहे. कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट यांनी शनिवारी(दि.२६) दावा केला की, मलेशियाच्या मध्यस्थीने २४ जुलैच्या रात्री दोन्ही देशांनी युद्धबंदीवर सहमती दर्शवली होती, परंतु करार झाल्यानंतर एका तासापेक्षा कमी वेळात थायलंडने आपली भूमिका बदलली आणि करारातून माघार घेतली. थायलंड आणि कंबोडियामध्ये दोन हजार वर्ष जुन्या शिवमंदिरांवरून सुरू असलेला संघर्ष रविवारीही सुरूच आहे. या संघर्षात आतापर्यंत ३३ जणांचा मृत्यू झाला असून शेकडो लोक जखमी झाले.

# एस.टी कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावू : मंत्री छगन भुजबळ

नाशिक : सेवा शक्ती संघर्ष एस.टी कर्मचारी संघ महाराष्ट्र राज्य वर्धापन दिनानिमित्त राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली नाशिकच्या दादासाहेब गायकवाड सभागृहात राज्यस्तरीय कामगार मेळावा पार पडला. या मेळाव्यात एस.टी कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावू . त्यांना योग्य वेतन आणि आरोग्य सेवा देऊ , असे भुजबळ यांनी आश्वासन दिले .

या कार्यक्रमाला मंत्री गिरीश महाजन, माजी मंत्री आमदार सदाभाऊ खोत, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, भाजप शहराध्यक्ष सुनील केदार, लक्ष्मण सावजी, यतीन कदम, गिरीश पालवे, सुधाकर बडगुजर, सतीश मेटकरी, भाऊलाल तांबडे, व्यंकटेश मोरे, पद्मश्री राजे, अनुप खैरनार, राहुल आरोटे यांच्यासह सेवा शक्ती संघर्ष एस.टी कर्मचारी संघाचे पदाधिकारी व एसटी कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, 'गोर गरीब कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी आपण कुणालाही अंगावर घेण्यासाठी तयार आहोत.या लढ्यात आपण एसटी कर्मचारी संघटनेच्या सोबत असून कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघटनेचे पदाधिकारी, मंत्रिमंडळातील सहकारी यांच्यासमवेत मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन एसटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावले जातील' भुजबळ पुढे म्हणाले की, जगातील कुठेलीही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही फायद्यात नाही. एसटी म्हणजे एक लोकसेवा आहे. गोर गरिबांची सेवा करण्यासाठी ती महत्वाची वाहिनी आहे त्यामुळे ही सेवा संस्था असून या ती फायद्यात कधी येईल याची वाट पाहत बसता येणार नाही. आवश्यक त्या तरतुदी एसटीसाठी कराव्याच लागणार आहेत. एसटी कर्मचारी कामाच्या अत्यंत अवघड परिस्थितीतही, खडतर हवामानात, अपुऱ्या सोयींमध्ये ही सेवा अखंड सुरू ठेवण्याचे काम करत आहे या सर्वांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे.

# 'महा स्माईल्स' मोहिमेमुळे विदर्भातील निष्पाप चेहऱ्यांवर फुलणार हसू - मुख्यमंत्री

मुंबई, २७ जुलै : बालकांच्या चेहऱ्यावरील दुभंगलेले ओठ (क्लेफ्ट) व फाटलेल्या टाळू (पॅलेट) या जन्मजात विकारावर उपचार आणि जनजागृती करून या बालकांच्या निरागस चेहऱ्यावर हसू फुलविण्याचे काम महा स्माईल्स मोहीमेमुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सवंदेनशील पुढाकारातून हे शक्य होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हे ध्येय असून यासाठी त्यांनी विदर्भातील अशा बालकांवर उपचार आणि जनजागृतीची गरज ओळखत स्वयंसेवी संस्थांना आवाहन केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या आवाहनाला 'स्माईल ट्रेन इंडिया' ही स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्वच्या शेफाली बजाज यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे हे स्वप्न आता मिशन मोडवर साकार होतांना दिसत आहे.

'स्माईल ट्रेन इंडिया' ही आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्व यांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून आता ही मोहीम पूर्णपणे मोफत राबविली जाणार आहे. 'महा स्माईल्स क्लेफ्ट जनजागृती आणि उपचार मोहीम' ही केवळ वैद्यकीय मोहीम नसून, हजारो बालकांना नवजीवन देणारी एक आशावादी चळवळ ठरणार आहे.

या आगळ्यावेगळ्या मोहिमेचा शुभारंभ नागपूर येथे ३१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत स्वामी विवेकांनद मेडिकल मिशन हॉस्पिटल, खापरी, येथून होणार आहे.

या पहिल्यावहिल्या उपक्रमाअंतर्गत पुढील ९० दिवसांत तीन विशेष मोबाईल व्हॅन विदर्भातील संपूर्ण ११ जिल्ह्यात फिरून लोकांमध्ये क्लेफ्ट विकाराविषयी माहिती देणार आहेत. यामध्ये लवकर निदान, उपचाराची शिफारस आणि गरजू बालकांसाठी मोफत शस्त्रक्रियांची नोंदणी असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या बालकांवर नागपूर, गोंदिया, अकोला, वर्धा येथील रूग्णालयात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

क्लेफ्ट विकार हा जन्मजात असून यात ओठ आणि टाळू हे दुभंगलेले असतात. जवळपास ७०० मुलांपैकी एका मुलांमध्ये हा विकार दिसून येतो. यावर शस्त्रक्रिया करूनच हा विकास दूर करता येते. वेळीच उपचार केले नाहीत तर कान बधिर होणे, बोलण्यात अडथळा येणे अशा वेगवेगळ्या व्यंगासोबत सामाजिक एकटेपणा येऊ शकतो. तथापि या विकारावर उपचार असून ६-७ शस्त्रक्रियेनंतर यावर पूर्णपणे मात करता येते. या सर्व शस्त्रक्रिया खर्चिक असल्याने आर्थिक दुर्बल कुटुंबातील व्यक्तींना ते परवडणारे नाही. म्हणूनच संवेदशील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी क्लेफ्ट वरील उपचार संपूर्ण मोफत व्हावे, यासाठी या विशेष मोहिमेचे आयोजन केले आहे.

क्लेफ्ट विकार असलेल्या बालकांना वेळेवर उपचार मिळाल्यास त्यांचे जीवन पूर्णतः सामान्य होऊ शकते. यासाठी केवळ उपचारच नव्हे, तर जागरूकता ही देखील तितकीच गरजेची आहे. त्यामुळे 'महा स्माईल्स' ही मोहीम विदर्भातील बालकांसाठी आरोग्यदूत ठरणारी आहे. या मोहिमेमुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील हजारो कुटुंबांना एक नवीन आशेचा किरण दिसणार आहे. अपूर्ण माहितीमुळे दुर्लक्षित राहिलेल्या समस्येवर आता तज्ज्ञांच्या मदतीने प्रभावी उपचार मिळणार आहे.

स्माईल ट्रेन आणि बजाज फिनसर्व यांच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या ११ जिल्ह्यातील मुलांमध्ये जन्मजात आलेले दुभंगलेले ओठ आणि टाळू विकार दूर होऊन त्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

# पंजाबमध्ये आयएसआय समर्थित पाच दहशतवादी शस्त्र आणि ड्रग्जसह अटकेत

चंदीगड, २७ जुलै : पंजाब पोलिसांनी अमृतसर या सीमावर्ती जिल्ह्यात कारवाई करत पाकिस्तानच्या गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित असलेल्या शस्त्र तस्करी टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पाच संशयित दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. हे टोळी भारतात शस्त्र आणि ड्रग्ज पुरवठ्याच्या कामात गुंतलेले होते.

पंजाबचे पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी रविवारी माहिती देताना सांगितले की, अटक करण्यात आलेल्या टोळीचा थेट संपर्क पाकिस्तानस्थित आयएसआय एजंटशी होता. त्यांच्या ताब्यातून एक एके सैगा रायफल, दोन मॅगझिन, दोन ग्लॉक पिस्तूलसह चार मॅगझिन, रायफलचे ९० जिवंत काडतूस, १० पिस्तुल काडतूस, साडे सात लाख रुपयांची ड्रग्जमनी, एक कार आणि तीन मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.

तपासादरम्यान, ही खेप नव उर्फ नव पंडोरी याला सुपूर्द करण्यात येणार होती, अशी माहिती समोर आली आहे. नव पंडोरी हा कुख्यात गँगस्टर जग्गू भगवानपुरिया याचा निकटवर्तीय असल्याचे समजते. पोलिसांच्या तपासात हा नेटवर्क दहशतवाद आणि गुन्हेगारी टोळ्यांच्या गठजोडीचा भाग असल्याचे उघड झाले आहे. पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी स्पष्ट केले की, पंजाब पोलिसांकडून राज्यात दहशतवाद, संघटित गुन्हेगारी आणि तस्करीला मुळासह संपवण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत.

# कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणांसाठी निधी उपलब्ध करून देणार : अजित पवार

## राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी भवन व उपहारगृहाच्या नवीन इमारतीचे लोकार्पण

अ. नगर दि २७ जुलै : राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण आहे. यासाठी शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी दिली.

राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी भवन व उपहारगृहाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला आमदार काशीनाथ दाते, माजी आमदार लहू कानडे, कैलास पाटील, डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे संचालक ॲड. केरू पानसरे, बाजार समितीचे सभापती अरुणराव तनपुरे, हर्ष तनपुरे, राजेंद्र नागवडे, अशोक सावंत, कपिल पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, कृषी उत्पन्न बाजार समित्या या शेतकरी व समाजाच्या मालकीच्या संस्था असून, त्या नफ्यात व काटकसरीने कशा चालतील, याचा विचार आवश्यक आहे. शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शेतीमध्ये वाढवण्यासाठी ५०० कोटींची तरतूद केली आहे. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उसाचे उत्पादन वाढविण्याचा विचार शेतकऱ्यांनी करावा. शेतीमध्ये फळबाग लागवड, तीन पिकांनंतर ऊसाच्या बियाण्यात बदल, आणि शाश्वत पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. नवीन पिढीने पर्यावरणपूरक व कचरामुक्त शहर उभारण्यास पुढाकार घ्यावा.



शासनाने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रासाठी २० लाख घरे मंजूर केली असून या घरांच्या बांधकामासाठी ५ ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. लाडकी बहिण योजनेसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ४५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, या योजनेचा लाभ केवळ अडीच लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील बहीणींनाच मिळणार आहे; नोकरदार कुटुंबांतील सदस्यांनी या योजनेचा लाभ घेऊ नये, असेही आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

श्री.पवार म्हणाले, राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज पुरविण्यासाठी २० हजार कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने ३ लाख रुपयांपर्यंत पीक कर्ज उपलब्ध करून दिले जात असून, शेतकरी कल्याणाच्या विविध योजनांसाठी दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करून पाच वर्षांत एकूण २५ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. दिव्यांग लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दिले जाणारे मासिक मानधन दीड हजार रुपयांवरून वाढवून आता अडीच हजार रुपये करण्यात आले आहे. कांद्याच्या खरेदीसाठी नाफेडच्या माध्यमातून शासन कटिबद्ध असून त्यासाठीही आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे. राज्याच्या उत्पन्नाच्या मर्यादेत शासनास कर्ज घेण्याची मुभा असून, देशातील एकूण जीएसटीपैकी महाराष्ट्राचा वाटा १६ टक्के आहे. यातील ५० टक्के म्हणजे ८ टक्के जीएसटीचा वाटा राज्य शासनास प्राप्त होतो.

केंद्र शासनाने पुणे - अहिल्यानगर नवीन रेल्वे मार्गास मंजुरी दिली असून, भूसंपादन प्रक्रियेद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येणार असून, त्यांना योग्य मोबदला देण्यात येईल. या मार्गामुळे शेतमालाची वाहतूक सुलभ होणार आहे. शिर्डी विमानतळावर नाईट लँडिंग सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. याठिकाणी सुसज्ज टर्मिनलसाठीही मंजुरी मिळालेली असून, आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांद्वारे देश-विदेशातील भाविक शिर्डीत येऊ शकणार आहेत. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

राहूरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजाचे कौतूक करतांना उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, राज्यातील उत्कृष्ट पहिल्या दहा कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राहुरी बाजार समितीचा समावेश असून, लवकरच वाबूरी येथे १५ एकर जागेत अद्ययावत जिनिंग मिल सुरू करण्यात येणार आहे.

# सहकाराच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे शासनाचे धोरण - विखे पाटील

## स्वाभिमानी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या सचिव संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन

शिर्डी, दि. २६ - २०४७ पर्यंत विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीमध्ये सहकार चळवळीचे योगदान महत्त्वाचे राहणार आहे. सेवा सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीस बळकटी देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणे व सहकारातून रोजगारनिर्मिती करणे हे केंद्र शासनाचे धोरण आहे, असे प्रतिपादन जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.




अकोले येथे स्वाभिमानी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या सचिव संघटनेच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार अमोल खताळ, आमदार सत्यजित तांबे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष माधवराव कानवडे, सचिव संघटनेचे अध्यक्ष गणेश रेवगडे, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी व राज्यभरातून आलेले सचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, सेवा सहकारी संस्थांच्या समस्या यापूर्वी गांभीर्याने घेतल्या गेल्या नव्हत्या. मात्र स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन झाल्यापासून सहकार चळवळीला भक्कम पाठबळ मिळाले आहे. केंद्र शासनाने जाहीर केलेले राष्ट्रीय सहकार धोरण यशस्वी करण्यासाठी सहकार चळवळ बळकट करावी. राज्य शासन सचिवांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांना सर्वतोपरी पाठबळ देईल. सेवा सहकारी संस्थांचा इतिहास गौरवशाली असून ज्या उद्दिष्टांनी या संस्था सुरू झाल्या, ती पूर्णत्वास जाऊ शकलेली नाहीत. आव्हानात्मक परिस्थितीत संस्थांचा कारभार सुरू आहे. त्यामुळे संस्थांना उत्पन्नाचे पर्याय उपलब्ध करून देण्याची दिशा केंद्र सरकारने घेतली आहे. मार्गदर्शक सूचनांच्या आधारे संस्था आपला व्यवसाय सुरू करू शकतात.

सोसायट्यांचे मानांकन करून त्यांच्यासाठी दर्जानुसार बँकिंग प्रणालीशी जोडणी करण्यात आली तर संस्थांना व्यवसायाची साखळी निर्माण होईल. सहकार चळवळीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ही सुरुवात असून सहकार बळकट करण्यासाठी शासन आपले पाठबळ देईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

राज्यमंत्री श्री.भोयर म्हणाले, सहकार मंत्रालयाने घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयांमुळे सहकार चळवळीला मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील काही भागांमध्ये सहकार क्षेत्रात चांगले कार्य झाले असले तरी विदर्भात मात्र सहकाराची स्थिती नाजूक आहे. सचिव आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांची जबाबदारी शासन घेणार असून लवकरच मंत्रालयात यासंदर्भात विशेष बैठक घेण्यात येईल. त्रिस्तरीय सहकारी रचनेमध्ये सोसायट्यांना नव्या सहकार धोरणात प्राधान्य देण्यात आले आहे.

# पंतप्रधानांनी घोषित केलेल्या योजनांची अंमलबजावणी करणार - डॉ. भागवत कराड

छत्रपती संभाजीनगर, २७ जुलै - पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून आयुष्मान भारत योजना देशभरात यशस्वीरित्या राबवली जात आहे. गरजू व गरीब कुटुंबांना मोफत उपचाराची सुविधा देणारी ही योजना छत्रपती संभाजीनगर शहरात प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी विविध ठिकाणी विशेष कॅम्प राबवले जाणार आहेत. अशी माहिती माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड यांनी आज दिली आहे.



या पार्श्वभूमीवर योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक नियोजन, अडचणी आणि उपाययोजना यासंदर्भात संबंधित विभागाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत एक महत्त्वपूर्ण समन्वय बैठक क्रांती चौक येथील संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत आयुष्मान भारत योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी

✼ लाभार्थ्यांची संख्या वाढविणे ✼ कॅम्पचे आयोजन प्रभावीपणे करणे ✼ जनजागृती वाढविणे

✼ तांत्रिक अडचणी सोडवणे

यासारख्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या माध्यमातून छत्रपती संभाजीनगरातील अधिकाधिक नागरिकांना या योजनेचा लाभ मिळावा, हा आमचा प्रयत्न आहे.असे डॉ. कराड यांनी सांगितले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उपायुक्त खानसोळेंनी केली घंटागाड्यांची अचानक पाहणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** महानगरपालिकेच्या वतीने खाजगी ठेकेदारामार्फत शहर स्वच्छता करण्यात येते, घंटागाड्या घरोघरी जातात का, तेथील कचरा घेतात का, याची खातरजमा महापालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे केली.

यावेळी त्यांनी महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षकासह घंटागाडीवरील कर्मचाऱ्यांना योग्य सूचना करून नियमितपणे घरांघरातील कचरा संकलन करण्याच्या सूचना केल्या.



महापालिका आयुक्त म्हणून मानसी या रूजू झाल्यानंतर उपायुक्त डॉ. खानसोळे यांच्याकडे स्वच्छता विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. तेव्हापासून त्यांच्या संकल्पनेतून शहरातील कचरा पडण्याच्या ठिकाणांना वाचन कट्टे बनविण्यात येत आहेत. ते कचरा डेपो आता नागरिकांसाठी बसण्याची ठिकाणे होत आहेत. यामुळे परिसरातील नागरिकही आपला कचरा घटागाडीत टाकत आहेत. घंटागाड्या नियमितपणे जातात का, प्रत्येकाच्या घरातील कचऱ्याचे संकलन केले जाते का, घंटागाड्यांमध्ये पूर्ण क्षमतेने कचरा वाहिला जातो का, ओला व सुका कचराच घंटागाड्यांमध्ये आहे का, याची पाहणी खुद्द डॉ. खानसोळे यांनी प्रभागात जाऊन केली. जेवढे क्यूआर स्कॅन केले, तेवढ्या घरांमधला कचरा संकलित होतो का, याची खात्री करून घेतली. त्याचप्रमाणे नागरिकांशी संवाद साधून घंटागाड्यांची काही तक्रार असल्यास कळविण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## शिव कावड यात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** पंचवीस वर्षाची परंपरा कायम ठेवत याही वर्षी मोती नगर लातुर भागातुन विजयकुमार बालकिशन शर्मा यांच्या शिवकावड पदयात्रा परळी वैद्यनाथ दिंडीचे रेणापूर तालुक्यातील लखमापूर पाटी कन्हैया हॉटेल येथे ढोल ताशाच्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

कालिदास खाडप यांच्या तर्फे सर्व भाविकांना चहा बिस्कीटची सोय करण्यात आली.यावेळी ललितकुमार शर्मा,प्रेम शर्मा,बिरजगोपल शर्मा,दत्ता भिसे,सचिन खाडप,चंद्रकात धायगुडे,नागुराव खाडप,धनंजय खाडप,विशाल खाडप,भास्कर धायगुडे,बंडु खाडप,उत्तम खाडप,वैभव खाडप,प्रणव खाडप,प्रताप खाडप,आदी उपस्थित होते.

## 'शाहू' मधील एनसीसी विभागामार्फत कारगिल विजय दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात एनसीसी विभागामार्फत कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे होते.

व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, परीक्षा नियंत्रक कॅप्टन डॉ.



ओमप्रकाश शहापूरकर, लेफ्ट डॉ. महेश वावरे, लेफ्ट डॉ. अर्चना टाक यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे एनसीसी म्हणाले की, एनसीसी छात्र हे इंडियन आर्मी चे भविष्य आहे व प्रत्येक छात्राने प्रशिक्षण घेऊन आपल्याकडून देशाची सर्वोत्तम सेवा घडावी असा आशावाद याप्रसंगी त्यांनी व्यक्त केला. प्राचार्य व व्यासपीठावरील सर्व उपस्थितांनी कारगिल मध्ये शहिद झालेल्या वीर योद्धांना श्रद्धांजली वाहिली. या निमित्ताने कॅडेट ओंकार वारद व संघ यांनी कारगिल वीर योद्धा कॅप्टन केंगुरुसे यांच्या शौर्यगाथे वर आधारित नाटिका सादर केली. या कार्यक्रमात सर्व एनसीसी कॅडेट्स यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार लेफ्ट डॉ. महेश वावरे यांनी मांडले.

## जयक्रांती महाविद्यालयास भूगोल संशोधन केंद्रास मान्यता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** लातूर येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयामध्ये भूगोल विषयातील संशोधन केंद्रास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या वतीने नुकतीच मान्यता दिली आहे. त्यामुळे भूगोल विषयात संशोधनाची संधी लातूरमध्ये उपलब्ध झाली आहे.

जयक्रांती महाविद्यालयात भूगोल विषयात तीनही प्राध्यापक पी.एच.डी प्राप्त व संशोधक मार्गदर्शक आहेत. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकात त्यांचे शोध निबंध प्रकाशित झाले आहेत. भूगोल विभागाने राष्ट्रीय, राज्यस्तरीय व विद्यापीठ स्तरीय कॉन्फरन्स व सेमिनार घेतलेले आहेत. तसेच पदव्युत्तर भूगोल विषयात अनेक विद्यार्थ्यांनी मिरीट मिळवलेले आहे. या भूगोल विषयातील संशोधन केंद्रामुळे विद्यापीठ परीक्षेत्रातील सर्व पीएचडी विद्यार्थ्यांना संशोधनास फायदा होईल. संशोधन केंद्राच्या मान्यतेबद्दल संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, बालाजी घार व प्राचार्य प्रशांत घार, डॉ. श्रीधर कोल्हे आदिंनी शुभेच्छा दिल्या.

## 'दयानंद कला'मध्ये रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** कारगिल विजय दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने भालचंद्र ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर घेण्यात आले.

या उपक्रमात एन.सी.सी. कॅडेट्स, एन.एस.एस. स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या शिबिरात ४० हून अधिक जणांनी रक्तदान केले. रक्तदात्याला प्रमाणपत्र व पौष्टिक आहार देण्यात आला.

# शासनाचा स्थगन आदेश असतानाही इतर रुग्णालयाच्या कामांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** एकीकडे शासनाने आरोग्य विभागातील बांधकामांना शिस्त लावण्याच्या नावाखाली राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये होऊ घातलेल्या विविध आरोग्य विभागाच्या बांधकामांना स्थगिती आदेश दिला आहे. मात्र, विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील हिंगणघट येथील ४०० खाटाच्या रुग्णालयाचे टेंडर शासनानेच काढले आहे. मात्र, लातूर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासाठी शासन का उदासिन आहे? असा संतप्त सवाल लातूरकरांमधून विचारला जात आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने २९ मे २०२५ रोजी शासन निर्णय पारित करण्यात आला होता की, मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेमध्ये राज्यातील आरोग्य सेवेच्या पायाभूत सुविधांच्या संदर्भात शिस्त आणणे आणि नियोजित पध्दतीची कामे हाती घेण्याचे निर्देश दिले. या अनुसरून सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत बांधकामांना शिस्तबध्द कार्यक्रम हाती घेण्याचे शासनाने ठरवले.

या माध्यमातून ज्या आरोग्य संस्थांचे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व इतर नवीन रुग्णालय, श्रेणीवर्धित रुग्णालय यांच्या बांधकामाबाबत त्याचे कार्यारंभआदेश देण्यात आलेले आहेत अशी सर्व बांधकामे पूर्ण करणे आवश्यक आहे. ही कामे पूर्ण झाल्याशिवाय, कोणत्याही नवीन आरोग्य संस्थांची बांधकामे मंजूर किंवा सुरू करता येणार नाही. ज्या आरोग्य संस्थांची बांधकामे मंजूर आहेत, मात्र त्यांचे बांधकाम सुरू झालेले नाही किंवा त्या बांधकामाचे

### जिल्हा रुग्णालयावरच अन्याय का? लातुरकरांचा संतप्त सवाल

कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत. त्याबाबत निविदा काढल्या असल्या तरीही अशा सर्व आरोग्य संस्थांच्या कामाच्या प्रशासकीय मान्यता सद्यस्थितीत रद्द करण्यात येत आहेत, असे या आदेशामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

हा अध्यादेश मे महिन्यात काढण्यात आला असल्यामुळे मे महिन्याच्या नंतर राज्यातील सर्वच जिल्ह्यातील अशा प्रकारच्या कामांना स्थगिती मिळाली होती. शासनाच्या या लालफितीच्या धोरणामुळे लातूर जिल्हा रुग्णालयाला हक्काची जागा पैसे भरून आरोग्य विभागाच्या ताब्यात आल्याच्या नंतर या ठिकाणी होऊ घातलेले जिल्हा रुग्णालय शासनाच्या या धोरणामुळे लालफितीत अडकले आहे. परंतु, राज्यशासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने शासनाने काढलेल्या या अध्यादेशाला केराची टोपली दाखवत विद्यमान शासनाच्यावतीने आपल्याच आदेशाची पायमल्ली करत ३ जुलै २०२५ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील ४०० खाटाच्या रुग्णालयाच्या उपजिल्हा बांधकामाकरिता निविदा काढण्यात आलेली आहे.

लातूर जिल्हा हा राज्यातील एकमेव असा जिल्हा आहे की ज्या जिल्ह्यामध्ये गेल्या १६ वर्षांपासून जिल्हा रुग्णालयाची मंजुरी मिळाली आहे. त्यासाठीच्या बांधकामाच्या निधीची देखील तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु, लातूर मध्ये नवीन जिल्हा रुग्णालय बांधण्यासाठी जागेचा प्रश्न प्रलंबित होता.

याबाबत 'माझं लातूर' परिवाराच्यावतीने सलग दोन वर्षे आंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष करीत लातूर शहरातील जिल्हा रुग्णालयासाठी मंजूर असणारी नांदेड रोडवरील कृषी महाविद्यालयातील दहा एकर जागा त्याचे पैसे न भरल्याने हा प्रश्न प्रलंबित होता. यावर समन्वय साधून लातूर जिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी राज्यशासनाने जागा हस्तांतरण करण्यासाठी लागणारा ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपयांचा मोबदला कृषी विभागाला देऊन ही जागा आरोग्य विभागाच्या ताब्यात दिली.

यामुळे लातूरला जिल्हा रुग्णालय बांधण्याचा प्रश्न मार्गी लागला व बहुप्रतिक्षीत आस्थापनेचे भूमीपुजन लवकरच होईल, अशी अपेक्षा लातूरकर करीत होते. मात्र मे महिन्यात काढलेल्या शासन आदेशामुळे लातूरकरांच्या जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाचा प्रश्न पुन्हा रखडला गेला आहे. लातूरकरांच्या हक्काचे, आणि नैसर्गिक न्यायानुसार लातूरला जिल्हा रुग्णालयाचे काम तत्काळ सुरू होण्यासाठी शासनाने पावले उचलावीत, अन्यथा यासाठीचे आंदोलन तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती 'माझं लातूर' या सामाजिक कार्यकरणाऱ्या परिवाराच्या वतीने देण्यात आली आहे.

## लातूर शहर महानगरपालिका आपत्कालीन कक्ष २४ तास कार्यरत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** लातूर पासून शहरात सतत पाऊस पडत असल्याने लातूर शहर महानगरपालिका आपत्कालीन कक्षातील कर्मचारी २४ तास कार्यरत असून आज शहरात इस्लामपूरा, डि- मार्ट व रिंग रोड दादाजी कोंडदेव नगर लक्ष्मी ग्रँड हॉटेलच्या समोर नाला मोठ्या जेसीबी मार्फत काढून नाले वाहते करण्यात आले .



तसेच सतत पाऊस पडत आसल्याने शहरातील विविध भाग तेली गल्ली, हत्ते नगर, जूना कव्हा रोड, चलवाड नगर, तथागत चौक, मेघराज नगर, आंबेडकर चौक, अंबाजोगाई रोड, खोरे गल्ली, वडारवाडा नाना-नानी पार्क येथील तुंबलेल्या नाल्या साफ करुन नाली वाहते करण्यात आले तसेच प्रभाग क्र.०२ गाझीपुरा ग्रीन बेल्ट मधील रस्त्यावर पडलेले झाड तोडून रस्ता वाहतूकीस खुल्ला करण्यात आला.

आपत्कालीन कामासाठी आपत्कालीन कक्ष २४ तास कार्यरत आहे.

तरी आपत्कालीन स्थितीत नागरीकांनी आपत्कालीन कक्ष प्रमुख श्री.रवी कांबळे मोबाईल क्रमांक ९९७०९६४४५३ यांच्याकडे संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## अनेक परिवारांचे देशमुखांनी केले सांत्वन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी रेणापूर तालुक्यातील दर्जीबोरगाव येथील कै.गंगाराम गवळी यांचे निधन झाले या अनुषंगाने त्यांच्या निवासस्थानी जावून गवळी कुटुंबियांचे सांत्वन केले. तसेच लातूर तालुक्यातील चिकलठाणा येथील कै.प्रभावती जाधव यांचे निधन झाले त्यांच्या निवासस्थानी जावून जाधव कुटुंबियांचे सांत्वन केले, यासोबतच महमदापुर येथील कै.दत्तराव शिंदे यांचे निधन झाले त्यांच्या निवासस्थानी जावून शिंदे कुटुंबियांचे सांत्वन केले.

तसेच चिकलठाणा येथील गोपाळ पाटील व नंदकुमार देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट दिली. यावेळी रेणाचे चेअरमन अनंतराव ठाकूर-देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव,२१ शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, रेणाचे व्हा चेअरमन प्रविण पाटील, संचालक रणजित पाटील,रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती शेषेराव हाके पाटील, जिल्हा बँकेचे संचालक राजकुमार पाटील, अनुप शेळके, जिल्हा काँग्रेसचे समन्वयक सचिन दाताळ , बाबासाहेब देशमुख,प्रकाश सुर्यवंशी, सचिन माटेगावकर, नरसिंग इंगळे, प्रताप शिंदे, बळवंत पाटील, विश्वनाथ कागले, दिनेश साळुंखे, चंद्रशेखर उरगुंडे, गोपाळ पाटील, उमेश इंगळे, नंदकुमार देशमुख, महेश देशमुख, अमृतराव जाधव, इस्माईल शेख,अजम शेख आदींची उपस्थिती होती.

## लातुरात मनशक्तीच्या वतीने आयोजित यश- शांतीसाठी न्यू वे उपक्रमास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** लातूर येथील भारत विकास परिषदेच्या मुख्य शाखेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या मनशक्तीच्या यश-शांतीसाठी न्यू वे उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ओम लॉन्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे उदघाटन विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान पंढरपूरचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते झाले.



याप्रसंगी मनशक्ती केंद्राचे प्रमुख मयूर चंदने, भारत विकास परिषदेचे मुख्य शाखेचे अध्यक्ष सुयोग जोशी, भारत विकास परिषदेचे उपाध्यक्ष शिरीष कुलकर्णी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी भावी पिढी घडविण्यासाठी मनशक्ती - भारत विकास परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे आयोजन सगळ्याच शाळांमधून झाले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. या उपक्रमाच्या सहकार्याने निश्चितच मुलांच्या आकलन शक्तीत, अभ्यासात नेत्रदीपक प्रगती होणार असल्याने हा उपक्रम अधिकाधिक संख्येने समाजातील सर्वच घटकांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ विद्यार्थी - पालकच नव्हे तर शिक्षकांच्याही सक्षमीकरणास मदत होणार असल्याचे सांगितले.

मनशक्ती केंद्राचे प्रमुख मयूर चंदने यांनी या अभिनव उपक्रमांविषयी सविस्तर माहिती दिली.



## लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे कारगिल विजय दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** जिल्हा क्रीडा संकुल येथील शहीद स्मारक परिसरात शनिवारी २६व्या कारगिल विजय दिनाच्या कार्यक्रमात शहीद सैनिकांच्या बलिदानाची कृतज्ञता व्यक्त करून त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी निवृत्त लेफ्टनंट कर्नल शरद पांढरे यांच्यासह वीरपत्नी, वीरमाता व वीरपिता यांच्यासह विविध माजी सैनिक संघटनांचे पदाधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी आणि माजी सैनिक यांची उपस्थिती होती.

## श्रावण मासारंभानिमित्त कावड यात्रा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** तालुक्यातील हरंगुळ (बु.) येथील कैलासनगरातून शनिवारी श्री शंभू महादेव मंदिरापर्यंत कावड यात्रा काढण्यात आली. यावेळी भाविकांनी ग्रामदैवत शंभू महादेवाला जलाभिषेक करून जलसाक्षरतेचा संदेश देण्यात आला. यावेळी राजकुमार वाघमारे महाराज यांनी भाविकांना कावडीचे महत्त्व सांगितले.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षे हरंगुळ (बु.)च्या कैलासनगरातील श्री शिवालय देवस्थानच्यावतीने कावड यात्रा काढण्यात आली. या कावड यात्रेत कैलासनगर, सदाशिवनगर, माउलीनगर, विठ्ठलनगर आणि परिसरातील भक्तांनी हजेरी लावली. श्रावण महिन्यात सुरू झालेल्या भक्तिमय पर्वाची सुरुवात कावडीने शंभू महादेवाला जलाभिषेकाने केली जाते. शंभू महादेवाचे तीर्थ घेऊन परिसरातील हनुमान मंदिर, विठ्ठल रखुमाई मंदिर, श्री वीरभद्रेश्वर, भद्रकाली माता, श्री त्रिपुरसुंदरी माता आदी देवस्थानच्या ठिकाणी जलाभिषेक करण्यात आला.

या कावड यात्रेत श्री शिवालय महिला भजनी मंडळाच्या पदाधिकारी दीपा पुरी, अनिता मिटकरी, सुमन कुंभार, अरुणा चव्हाण, पल्लवी घोडके, अनिता देगलमोडे, वंदना पोतदार, स्वरुपा हिरास, सुशीला डोंगरे, शिवकांता होनराव, सुशीला चोबळे, सुनंदा कोळेकर, सुशीला किसवे, उमा काठेवाड, संगिता ढेकणे, मीनाक्षी येरनाळे, रामेश्वर महाराज होनराव यांच्यासह परिसरातील भाविकांची उपस्थिती होती.

## बालस्नेही ग्रामपंचायतसाठी प्रत्येक सरपंचाने पुढाकार घ्यावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जुलै -** रेणापूर तालूक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत बालस्नेही झाली पाहीजे यासाठी प्रत्येक गावच्या सरपंचानी आणि ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घ्यावा आसे प्रतिपादन रेणापुर पंचायत समिती व कलापंढरी संस्थेच्या संयूक्त विद्यमाने रेणापुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आलेल्या पंचायत समिती सभागृहात ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्यांचे बाल स्नेही विषयावर प्रशिक्षण संपन्न झाले, यावेळी प्रमुख प्रशिक्षक म्हणून प्रा डॉ बाळासाहेब गोडबोले बोलत होते.



आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेणापूर पंचायत समितीचे सहाय्यक प्रशासन अधिकारी बी एस पाटील,होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विस्तार अधिकारी गोविंद काळे,विस्तार अधिकारी भास्कर पाटील,कलापंढरी संस्थेचे समन्वयक शिवदर्शन सदाकाळे तर प्रमुख प्रशिक्षक म्हणून प्रा डॉ बाळासाहेब गोडबोले होते .सर्व प्रथम लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना प्रा डॉ बाळासाहेब गोडबोले म्हणाले की,बालस्नेही ग्रामपंचायत म्हणजे बालकांचा सर्वांगीण विकास आणि बालकांना गावात मिळणारे सर्व प्रकार चे संरक्षण,दर्जेदार मिळणारे शिक्षण होय , बालस्नेही ग्रामपंचायत करण्यासाठी बालसभा घेणे ज्याद्वारे बालकांना आपले म्हणणे मांडता आले पाहिजे, महिला सभेप्रमाणेच या प्रक्रियेसाठी ग्रामपंचायतनी पुढाकार घ्यावा, तसेच शासनाच्या योजनेची बालक व पालक यांना माहिती सांगितली पाहिजे, बालकांच्या नियोजनानुसार गावात कृती कार्यक्रमाचे नियोजन केले पाहिजे असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देवांचे वस्त्र बनवण्याची स्पर्धा हा अनोखा उपक्रम- डॉ. उज्वला दहिफळे

## मंदिर अर्चक पुरोहित आयाम महिला विभागाचा बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न

छत्रपती संभाजीनगर - विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामातर्फे घरातील शास्त्रशुद्ध पूजा कशी करावी तसेच पंचांग कसे पाहावे यासंदर्भातील कार्यशाळा यापूर्वी छत्रपती संभाजीनगर मध्ये घेतल्या या कार्यशाळांना भरभरून प्रतिसाद मिळाला हा भाग लक्षात घेऊन यावेळी महिला विभागाने देवांचे वस्त्र बनवण्याची स्पर्धा घोषित केली हा अनोखा उपक्रम आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्लास्टिक सर्जन डॉक्टर उज्वला दहिफळे यांनी प्रतिपादन केले त्या मंदिर अर्चक पुरोहित आयाम महिला मंडळातर्फे शनिवार दिनांक २६ जुलै २०२५ रोजी दुपारी चार वाजता भक्ती गणेश मंदिर सिडको संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून जे जे प्लस हॉस्पिटलच्या संचालिका सौ सुनीता राजपूत आणि विश्व हिंदू परिषद देवगिरी



प्रांताच्या उपाध्यक्ष कुंदाताई अंदुरे मंदिर आयामाच्या देवगिरी प्रांत महिला विश्वस्त प्रमुख सौ राजश्री भिते आणि संभाजीनगर जिल्हा प्रमुख सौ अनुराधा पुराणिक यांची प्रमुख उपस्थिती होती

यावेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या महिला आपल्या व्यस्त वेळेतून अशा कार्यक्रमासाठी वेळ काढतात हे कौतुकास्पद आहे त्यामुळे यापुढे अशा प्रकारचे कोणतेही कार्यक्रम असतील तर मी त्यात माझा सहभाग नोंदवीन.

व्यासपीठावरील मान्यवर प्रमुख अतिथी सौ सुनीता राजपूत आणि प्रमुख उपस्थिती असलेल्या कुंदाताई अंदुरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि मंदिर अर्चक पुरोहित आयमाच्या महिला विभागाने देवांच्या वस्त्र बनवण्याच्या आयोजित केलेल्या स्पर्धेचे कौतुक केले यापुढेही अशा विविध स्पर्धांचे आयोजन करत राहावे यासाठी शुभेच्छा दिल्या

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलनानंतर सौ राजश्री भिते यांनी प्रास्ताविक केले. देवांचे वस्त्र बनवण्याच्या स्पर्धेचे परीक्षण सौ संगीता धकाते आणि सौ रचना ठोंबरे यांनी केले

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अंकीता अशोक तिवारी द्वितीय क्रमांक शैलजा मुकूंद कुलकर्णी तृतीय क्रमांक किर्ती आनंद ओझा आणि उत्तेजनार्थ अनिता अरूण काशीकर व अलका खंडेलवाल यांना देण्यात आला याशिवाय परीक्षकांतर्फे कविता विशाल पाराशर आणि पल्लवी भागवत यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हाप्रमुख सौ अनुराधा पुराणीक यांनी केले तर सूत्रसंचालन कुमारी अद्या देशपांडे आणि कांचन तेल वाडकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजश्री भिते अनुराधा पुराणिक स्वाती जोशी स्नेहल पांडव कांचन तेलवाडकर ज्योती गुरव रत्नमाला पोहेकर माधुरीताई पाटील कीर्ती डोणगावकर आनंदी डोणगावकर राजीव जहागीरदार राजेंद्र पाथरीकर शिवाजीराव दहिवाल यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येत महिला पुरुष नागरिक उपस्थित होते

# कन्नड तालुक्यातील अतिवृष्टी !

## नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

तभा वृत्तसेवा - सहयोग प्र.जावळे

कन्नड :- तालुक्यात दि.२६ जुलै रोजी दुपार नंतर मुसळधार पावसाने हजेरी लावत तालुक्यातील सगळया महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे.

अतिवृष्टीमुळे तालुक्यातील मध्यम प्रकल्पासह धरणे, नदी नाल्यांना पूर आला आहे तर बऱ्याच गावांचा दि.२६ रोजी संपर्क तुटला होता,या पुरात नदीवरील पूल वाहून गेल्याची घटना घडली आहे तर शहरालगत असलेल्या माळीवाडा परिसरात वाहन वाहून गेल्याची प्राथमिक माहिती आहे,अंजना नदीवरील तपोवन (निंभोरा) प्रकल्प व गांधारी नदीवरील गंधेश्वर धरण ओव्हर फ्लो झाले आहे तर शिवना नदीला पूर आल्याने तालुक्यातील सर्वात मोठा प्रकल्प शिवना टाकळी प्रकल्पात अतिवृष्टीमुळे पाण्याचा ओघ सुरू आहे.तर आंबा येथील लघु प्रकल्पात ९६.४६ टक्के पाणीसाठा झाल्याने आजूबाजूच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे

अतिवृष्टीमुळे तालुक्यातील रब्बी पिकांचे मात्र मोठे नुकसान झाले असून शेतात पाणी साचल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न उभा राहिला आहे जर असेच वातावरण राहिले तर रब्बी पिकांना याचा मोठा फटका बसणार आहे.

शिवना टाकळी मध्यम प्रकल्प ६०.५९%, पूर्णा नेवपूर मध्यम प्रकल्प - ३३.१६%, अंजना पळशी मध्यम प्रकल्प - ७२.२%, अंबाडी मध्यम प्रकल्प - २७.२९%, गंदेश्वर लघु प्रकल्प - ओव्हरफ्लो, सातकुंड लघु प्रकल्प - ३.६०%, रिठी मोहार्ड डॅम - ६.८७%, चापनेर लघु प्रकल्प -३०.४५%, औराळा लघु प्रकल्प -००.००, देवगाव रंगारी बृ. ल.पा. लघु प्रकल्प -००.००, माटेगाव लघु प्रकल्प - ३९.५०%, निंभोरा लघु प्रकल्प - १००%, आंबा लघु प्रकल्प - ९६.४६%, कुंजखेडा लघु प्रकल्प -१०.२१%, गणेशपूर लघु प्रकल्प - ९.६५%, वाघदरा लघु प्रकल्प - १००%, वडनेर लघु प्रकल्प - ६९.१९%.

## संत श्री ज्ञानेश्वर महाराज ७५० वा जन्मोत्सव तथा गोकूळ अष्टमी महोत्सव

तभा वृत्तसेवा



गंगापूर दि.२७: श्री विठ्ठल आश्रम याच्यां वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा ७५० वा जन्मोत्सव तथा गोकूळ अष्टमी महोत्सव सप्ताहाचे आयोजन गाथामूर्ती ह भ प रामभाऊजी महाराज यांच्या नेत्वृत्वाखाली आयोजन करण्यात आले सप्ताह प्रांरभ ९ ऑगस्ट तर सांगता १६ ऑगस्ट शनिवार रोजी होणार दैनंदिन कार्यक्रम पुढील प्रमाणे

पहाटे ४ ते ६ काकडा भजन सकाळी ७ ते ९:३० ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण , सकाळी १० ते १२ किर्तन दुपारी ४ ते ५ प्रवचन सांय ५ ते ६ हरीपाठ रोज रात्री ७ ते ९ किर्तन श्रावण व ८ शनिवार दि १६/८/ २०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री विठ्ठल काल्याचे किर्तन तदनंतर महाप्रसाद होईल या वेळी सप्ताहास प पु श्री महंत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज प पु मंहत गुरुवर्य आदिनाथ महाराज शास्त्री , प पु गुरुवर्य ह भ प श्री भारतानंदगिरीजी महाराज हे महाराज सप्ताह काळात भेट देणार आहे श्री संत ज्ञानेश्वर महाराज ७५० वा जन्मोत्सव असल्याने जास्तीत जास्त महिला व पुरुषांनी ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायणासाठी बसावे व सप्ताह काळा मध्ये जास्तीत जास्त समाजाने उत्सव काळात सहभाग घ्यावा असे आवाहन श्री विठ्ठल आश्रम परीवारातर्फे करण्यात आले

# संस्कारच माणसाला भगवान बनवतो - विरंजन सागर महाराज

छत्रपती संभाजीनगर - गुरुपुष्यामृत योगाचे औचित्य साधत महासहस्रनाम मंत्रोच्चारण जप अनुष्ठानाचे आयोजन केले होते. यामध्ये ६१० भाविक सहभागी झाले. प्रत्येकाने ११०० लवंगा या अनुष्ठानात अर्पण केल्या. देशमुखनगरात पहिल्यांदाच होत असलेल्या चातुर्मास सोहळ्यातील हा महत्त्वाचा विधी ठरला. यामध्ये सर्व भाविकांनी मिळून ६ लाख १४ हजार ८८० लवंगा अर्पण केल्या. पहलगाम आणि विमान अपघातात निष्पापांचे बळी गेले. यासाठी विश्वशांतीच्या मनोकामनेने हा जपसोहळा झाला.

उपाध्याय विरंजनसागर महाराज पहिल्यांदाच महाराष्ट्रात चातुर्मासासाठी आले आहेत. मंदिराजवळील मल्लिनाथ देशना सभामंडपात हा धार्मिक सोहळा पार पडला. यावेळी संस्कारच माणसाला भगवान बनवतो, असं उपाध्याय श्री विरंजन सागर महाराज मधील श्री १००८ मल्लिनाथ देशना मंडप, देशमुखनगरात गुरुपुष्यमृत कार्यक्रम प्रसंगी सांगितलं. आज मुनि श्रींनी मंत्र साधना केली.

आज गुरु पुष्ययोग नक्षत्रावर विशेष मंत्र साधना करण्यात आली आणि भक्तांना सुख-शांतीचा मार्ग दाखवण्यात आला. हजारो भक्तांनी एकत्र येऊन मंत्र साधना केली आणि सर्व भक्त मंत्रमुग्ध झाले.



कार्यक्रमाची सुरुवात गुरुजींच्या पादप्रक्षालनाने झाली. समाजातील प्रतिष्ठित गणमान्य सदस्य यावेळी उपस्थित होते यावेळी देशमुख नगर अरीहतनगर बालाजी नगर शीवाजीनगर राजाबाजार वेदांत नगर सेठीनगर आदी ठीकानाहून भाविक हजर होत

## अठ्ठावीस युगाच्या बायकांच्या एकटेपणाचे समूहगान म्हणजे तिरिया काव्यसंग्रह : कवि दासू वैद्य

छत्रपती संभाजीनगर, दि.२७ : अभिनेते मिलिंद शिंदे यांनी तिरिया' काव्यसंग्रहात त्यांच्या आयुष्यात आलेल्या अनुभवांना अलगदपणे घेऊन कवितेमध्ये शब्दबद्ध केले आहे. यामध्ये अनेक स्त्रियांची कैफियत मांडलेली असून अठ्ठावीस युगाच्या बायकांच्या एकटेपणाचे समूहगान म्हणजे तिरिया काव्यसंग्रह असल्याचे प्रतिपादन कवि दासू वैद्य यांनी यावेळी केले. मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन आणि एमजीएम कॉलेज ऑफ कम्युनिकेशन कल्चर अँड मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिनेते मिलिंद शिंदे यांच्या 'तिरिया' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आईनस्टाईन सभागृह, एमजीएम परिसर येथे संपन्न झाला. यावेळी, कवि दासू वैद्य यांनी उपस्थितांशी संवाद साधला. या प्रकाशन सोहळ्यास अभिनेते मिलिंद शिंदे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा.ऐश्वर्य पाटेकर, मैत्री पब्लिकेशनच्या मोहिनी कारंडे, नीलेश राऊत, डॉ. रेखा शेळके, प्रेरणा दळवी, डॉ. शिव कदम व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना कवि दासू वैद्य म्हणाले, हा कविता संग्रह छोटासा जरी असला तरी यातील एक - एका कवितेचे जे टेमकाड आहे, ते टेमकाड चढताना दमछाक होते. यातील एक कविता वाचली की वाचकाला थांबावे लागते. कारण, यातील प्रत्येक कविता आपल्यामध्ये अर्थाचे आणि अनुभवाचे वलय निर्माण करते.

## विद्यापीठ प्रशासनामुळे विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण धोक्यात

# एम.फिल विद्यार्थ्यांना तत्काळ पी एच डी प्रवेश द्यावा : मंत्री संजय शिरसाट



खुलताबाद प्रतिनिधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मरा ठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग, अर्थशास्त्र, ग्रंथालय, मराठी, इतिहास, इंग्रजी, कॉमर्स यासह अनेक विद्याशाखेतील एम.फिल पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना राज्य व केंद्र सरकारच्या बार्टी, सारथी, संस्थेमार्फत एम.फिल ते पीएचडी अशी फेलोशिप मंजूर आहे. परंतू संशोधक मार्गदर्शक अभावी व ज्या विद्यार्थ्यांकडे मार्गदर्शक आहेत त्यांची ऊळउ, ठठउ होऊन देखील एम.फिल विद्यार्थ्यांना पीएचडी प्रवेश देण्यात येत नसल्यामुळे गेल्या अनेक महिन्यापासून संशोधक विद्यार्थी विद्यापीठ प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहेत. परंतु विद्यापीठ प्रशासनाकडून संशोधक विद्यार्थ्यांच्या मागणीची दाखल घेत नसल्यामुळे त्यांनी सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांची शनिवारी त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन मागण्याचे निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे. तत्कालीन कुलगुरू प्रमोद येवले यांच्या कार्यकाळात १२ जून २०२३ रोजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने काढलेल्या पत्रकानुसार विद्यार्थ्यांना न्याय देण्यात यावा

# नागरिकांच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलतेने उपाययोजना करा - राधाकृष्ण विखे पाटील

अहिल्यानगर दि.२७- जिल्ह्यातील नागरिकांच्या प्रश्नाबाबत अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने उपाययोजना करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

पालकमंत्री कार्यालयात जनता दरबारच्या माध्यमातून पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्राप्त झालेल्या अर्जावर सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय घोगरे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जुने जिल्हाधिकारी परिसरातील पालकमंत्री कार्यालयात सकाळी ११.३० वाजेपासून पालकमंत्र्यांनी नागरिकांच्या भेटी घेण्यास प्रारंभ केला. प्रत्येक नागरिकाचा अर्ज स्वीकारून त्यांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. व्यक्तिगत संवादातून त्यांनी नागरिकांच्या समस्यांचे यशस्वीपणे निराकरण केले. अहिल्यानगर महानगरपालिका, भूमी अभिलेख, जलसंपदा, महावितरण, महसूल, जलसंधारण, वनविभाग यासह इतर विभागाच्या संदर्भातील अर्ज जनता दरबारात प्राप्त झाले. प्राप्त झालेल्या सर्व अर्जावर गांभीर्याने कार्यवाही करून पालकमंत्री कार्यालयास आणि संबंधित अर्जदारास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

# कौशिक आश्रमच्या शिबिरात ३८४ जणांचे रक्तदान

पुणे, २७ जुलै : कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान या संस्थांच्या वतीने रविवारी आयोजित रक्तदान शिबिरात ३८४ जणांनी रक्तदान केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चौथे सरसंघचालक प्रो. राजेंद्रसिंहजी उर्फ रज्जूभय्या यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिवर्षी हे शिबिर आयोजित करण्यात येते.

मित्रमंडळ कॉलनीतील कौशिक आश्रम येथे हे शिबिर भरवण्यात आले होते. ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक बबन पोतदार, प्रथितयश स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. लीना पाटणकर, संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक



प्रा. सुरेश उर्फ नाना जाधव आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील राऊत यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. डॉ. हेडगेवार रक्तकेंद्र सोलापूर आणि जनकल्याण रक्तकेंद्र पुणे यांच्या सहयोगाने हे शिबिर आयोजिण्यात आले होते.

रक्तदानामुळे ज्याला रक्त मिळते त्याला तर फायदा होतोच, शिवाय जो रक्तदान करतो त्यालाही त्याचे लाभ मिळतात. म्हणून रक्तदान शिबिराचा उपक्रम खूप महत्त्वपूर्ण आहे, असे डॉ. पाटणकर म्हणाल्या. कौशिक आश्रमसारख्या संस्था करत असलेले शिबिर आयोजनाचे कार्य अधिक गतीने पुढे जाईल, असा विश्वास पोतदार यांनी व्यक्त केला.

थॅलेसेमियाच्या रुग्णांना सातत्याने रक्त द्यावे लागते. महाराष्ट्रात जनकल्याण रक्तकेंद्र साखळीमध्ये असलेल्या सर्व रक्तकेंद्रांमार्फत या रुग्णांना आवश्यक ते साहाय्य करण्यासंबंधीची योजना आखण्यात आली असून हे काम या रक्तकेंद्रांमार्फत सुरू झाले आहे, अशी माहिती प्रा. नाना जाधव यांनी दिली.

संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य सुहासराव हिरेमठ, ज्येष्ठ प्रचारक श्रीधरपंत फडके, रक्ताचे नाते या संस्थेचे राम बांगड तसेच विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिबिराला भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. संस्थेचे कार्यवाह राजाभाऊ पानगावे यांनी प्रास्ताविक, नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन आणि मंदार सहस्त्रबुद्धे यांनी आभार प्रदर्शन केले.

सचिन कदम यांचे ८३ वे रक्तदान

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील वरिष्ठ अधिकारी सचिन कदम यांनी शिबिरात भाग घेत ८३ वे रक्तदान केले. महाविद्यालयात १९९१ मध्ये अकरावीत प्रवेश घेतला तेव्हापासून कर्तव्याच्या भावनेतून रक्तदान करत असल्याचे त्यांनी सांगितले.

## गलवाडा(अ) येथील जय मातादी फाउंडेशन तर्फे जिल्हा परिषद प्राथमिक प्रशालेत वृक्षरोपण



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ जुलै

सोयगाव तालुक्यातील गलवाडा(अ) येथील जय मातादी फाउंडेशन तर्फे जिल्हा परिषद प्राथमिक प्रशालेत वृक्षरोपन करण्यात आले.जय मातादी फौंडेशन गलवाडा कडून सामाजिक धार्मिक कार्यात मोलाचे कार्य करीत असून गावातील सर्व धार्मिक स्थळांची साफसफाई करणे गावातील काडी कचरा गोळा करून गावाबाहेर फेकणे, शाळेमध्ये विविध उपक्रम राबवणे गरजू नागरिकांना मदत करणे,रुग्णांना दवाखान्यामध्ये पोहोच करणे आधी सामाजिक कार्य करीत असून गावातील नागरिकांची सेवाकरण्याची संधी मिळत आहे.

जय मातादी फाउंडेशन ग्रीन डे दिनाचे औचित्य साधून जि. प.शाळेत सामाजिक बांधिलकी जपत वृक्षरोपण केले वृक्ष जगविने व संवर्धन करण्याची जबाबदारी देखील स्वीकारली. सादर कार्यक्रमाचे जय माता दि फाउंडेशन प्रमुख अमोल मंडवे,योगेश इंगळे गोपाल इंगळे अशोक कल्याणकर,किशोर स ा े न व ण े , ग ण े श कल्याणकर,कविता खरे,रवी मोरे,निलेश कल्याणकर,मंगेश मंडवे,तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश वंजारी, रघुनाथ काटोले, चव्हाण, रामदास चांडोल, व देशमुख,आदी उपस्थित होते. अशा सेविका लक्ष्मीबाई इंगळे, व अंगणवाडी सेविका लताताई इंगळे हजर होते.

## कंचनबाई बुरड यांचे निधन

अ. नगर : पिंपळगाव बसवंत ( ता. निफाड, जि. नाशिक ) येथील सुश्राविका कंचनबाई मांगीलाल बुरड (वय ८७) यांचे संथाराव्रतात निधन झाले. त्यांनी शनिवार दिनांक २६ रोजी दुपारी चार वाजता साध्वी प्रीतीसुधाजी म.सा. यांच्याकडून हे व्रत धारण केले होते. त्यांच्या पश्चात मुले वर्धमान, पारसमल व शांतीलाल, तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# रुद्रेश्वर लेणीच्या दर्शनासाठी पर्यटकांची मोठी गर्दी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि२७ जुलै : सोयगाव पासून सहा किलोमीटर अंतरावर रुद्रेश्वर(लेणी) मंदिराचा महिमा व इतिहास छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर पासून १३० किलोमीटर अंतरावर व जळगाव पासून दक्षिणेस ६५ किलोमीटर अंतरावर अजिंठा पर्वत रांगेत अजिंठा लेणीच्या पाठीमागील डोंगरात वसलेले स्वयंभू एका खांबावरील पन्नास बाय तीस खडकांमधील कोरीव शिवमंदिर म्हणजेच रुद्रेश्वर (लेणी )महादेव मंदिर साधारण अजिंठा लेणीच्या काळातील कोरीव काम झाले असावे असा अंदाज येतो सोयगाव- गलवाडा गावापासून वेताळवाडी मार्गे सात किलोमीटर अंतरावर पूर्वेस हे रुद्रेश्वर लेणी मंदिर आहे.या मंदिराचा शोध फार फार वर्षांपूर्वी गाई म्हशी चारणारे गुराखी यांनी लावला आहे.मंदिरावरून



जवळजवळ महाशिवरात्रीपर्यंत दोनशे फूट वरून पडणारा धबधबा भाविकांच्या डोळ्याचे पारणे फेडतो मंदिराच्या समोर प्रचंड असा तीर्थकुंड आहे.मंदिरात प्रवेश केल्याबरोबर महाकाय अशा सहा फूट उंच व तीन फूट रुंद अशी देखणी गणपतीची मूर्ती पहावयास मिळते गणपतीच्या बाजूला रिद्धी आणि सिद्धी अशा दोन छोट्या मुर्त्या कोरीव काम केलेल्या आहे. गणपतीच्या उजव्या बाजूस खडकामध्ये कालभैरव व डाव्या बाजूस नरसिंहाची मूर्ती आहे पश्चिम बाजूस भव्य अशी साडेतीन फूट लांब व दोन फूट रुंद अशी भव्य नंदीची मूर्ती आहे या मूर्तीच्या उत्तरेस महाकाय असे स्वयंभू शिवलिंग म्हणजेच रुद्रेश्वर शिवलिंग आहे.

मंदिर परिसरात तील डोंगर दांड्या पाहिल्यावर शिमला,जम्मू,काश्मीर येथे आल्याचे भक्तांना वाटते समोर पाझर तलाव उंच उंच झाडी तसेच पश्चिम दिशेस वेताळवाडी किल्ला या ठिकाणाहून नजरेस पडतो परंतु खंत एकच वाटते इतकं सुंदर देखिव मंदिर परिसरात असताना येथे कुठल्याही प्रकारची सभामंडप जाण्यासाठी रस्ता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था लाईटची व्यवस्था काहीही शासनामार्फत झालेलं नाही भगवंत त्यांना सुबुद्धी देऊन या मंदिरासाठी भरघोस असा निधी देण्याचे सुबुद्धी देवो हीच रुद्रेश्वर चरणी प्रार्थना करणारा भक्त व लेखक गोविंद माधव औरंगे रा.गलवाडा (अ) तालुका सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# सोयगाव येथील हुतात्मा विश्वनाथ राजहंस औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे कारगिल विजय दिवस साजरा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ जुलै : येथील हुतात्मा विश्वनाथ राजहंस औद्योगिक प्रशिक्षण संस्था,सोयगाव येथे कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला.संस्थेचे प्राचार्य मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी वातावरणात पार पडला.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून दुग्ध उत्पादक उद्योजक व संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे स्वीकृत सदस्य लोकेश पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या प्रभावी भाषणात त्यांनी देशसेवेचे महत्त्व अधोरेखित



करताना,राणी दुर्गावती यांच्या शौर्याचे प्रेरणादायी उदाहरण विद्यार्थ्यांसमोर मांडले.

त्याचप्रमाणे आयएमसीचे स्वीकृत सदस्य विकास देसाई यांनीही उपस्थितांची मने जिंकली.विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधींबाबत माहिती देताना,रोजगार समाचार व एम्प्लॉयमेंट न्यूज हे साप्ताहिक संस्थेमध्ये उपलब्ध करून देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या विशेष भागात कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधून सोयगाव तालुक्यातील निंबायती येथील माजी सैनिक सितराम पाटील व सोयगाव येथील दिलीप बारी यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. सितराम पाटील यांनी आपल्या अनुभवातून युद्धभूमीवरील शस्त्रास्त्रांविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच,सैन्य दलामधील आयटीआय व्यवसायांचे महत्त्व आणि त्या क्षेत्रातील रोजगार संधींबाबत सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रशिक्षण प्रमुख रेणुका कुलकर्णी,निदेशक दिलीप बागुल,नीता दांदळे,दर्शन ठाकूर,शफिक शेख,पोपट रावते यांच्यासह संस्थेचे सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उगले यांनी तर आभार प्रदर्शन नीता दांदळे यांनी केले.

## श्री स.भु. प्रशाला बालानगर येथील विद्यार्थ्यांचे गिरीभ्रमण

बिडकीन दि २७ जुलै श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्था छत्रपती संभाजीनगर आयोजित पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ जयंतीनिमित्त शाखांतर्गत जांभळी रामटेकडी पर्वत गिरीभ्रमण मोहिमेत पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बालानगर येथील विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसोबत प्रशालेचे क्रीडाशिक्षक संतोष शिंदे व ग्रंथपाल राहुल जाधव होते. या मोहिमेचे प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र गायकवाड, शालेय समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य आणि सर्वच शिक्षक शिक्षकेतर सहकाऱ्यांनी कौतुक करून अभिनंदन केले.

## जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. २६५/२०२५ पुढील तारीख २६/०८/२०२५

अर्जदार : १. केसरबाई फकीरराव जाधव, वयः ८५ वर्ष, धंदाः घरकाम, रा. पळशी बु, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. वत्सलाबाई जयवंता गोराडे, वय. ७० वर्ष, धंदा. घरकाम, रा. मोहरा, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन. व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते २ हे मयत फकीरराव सांडू जाधव यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ व २ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्र. १ ही फकीरराव सांडू जाधव यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ मुलगी आहे. नामे मयत फकीरराव सांडू जाधव यांना अर्जदार क्र. १ व २ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. मयत फकीरराव सांडू जाधव अर्जदार क्र.१ व २ यांचे पति व वडील हे दि. ०२/०४/२००५ रोजी मयत झालेली आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा पळशी बु, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत फकीरराव सांडू जाधव यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभघेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिः २३/७/२०२५

आदेशावरुन

कनिष्ट लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायधिश क. स्तर, कन्नड

## रोखठोक

दिनेश गुणे

# राजकारण म्हणजे काय रे भाऊ?

सामान्य जनतेस राजकारणात मोठा रस असतो. राजकीय वर्तुळात घडणाऱ्या घडामोडी, कुरघोडीचे खेळ, धोबीपछाडचे डावपेच, कात्रजचे घाट आणि असे बरेच काही राजकारणात जे चालत असते, त्यावर मनसोक्त गप्पा मारणे, अशा घडामोडींचे आपापसातील विरंगुळ्याच्या चर्चांमधून विश्लेषण करणे आणि त्यावर बेतलेली भाकिते छातीठोकपणे वर्तविणे हा अनेकांचा आवडता छंदही असतो. पण बरेचदा, राजकारण म्हणजे नेमके काय, ते कसे चालते, ते कोण चालविते, याचा नेमका अंदाजच कोणासही नसतो. अनेकांस तर, राजकारण कशाशी खातात हेही ठावूक नसते. त्यामुळेच, राजकारणावर मनसोक्त गप्पा मारून, चर्चा करूनही, राजकारण म्हणजे काय याचे नेमके उत्तर मात्र फारसे कोणास देता येत नाही. राजकारण हे चार आंधळे व हत्ती यांच्या एका जुन्या गोष्टीसारखे असल्याने, आपल्या आपल्या आकलनशक्तीनुसार राजकारण समजून घेण्याचा अनेकांचा अट्टहास मात्र नेहमीच असतो. काहींच्या मते, राजकारण हे सत्ताकारण असते, काहींना राजकारणाचे मूळ समाजकारणात दिसते, तर काहींना राजकारण हा बुद्धिबळाचा, डावपेचांचा आणि कुरघोडीचा खेळ वाटतो. काही जणांना राजकारण हे कमाईचे साधन वाटते, तर काहींना पैसा उडविण्यासाठी राजकारणाचा आसरा घ्यावा लागतो. प्रत्यक्षातील राजकारणाची व्याख्या मात्र खरोखरीच निर्मळ असते. राजकारण म्हणजे समाजासाठी निर्णय घेणे व संसाधनांचे समाजात वाटप करणे, तसेच सत्ता मिळविणे व सत्तेच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याकरिता सत्ता सांभाळण्याकरिता धडपडत राहणे या प्रक्रियेस साधारणपणे राजकारण म्हटले जाते. त्यामध्ये साहजिकच, समाज, सरकार, निवडणुका, धोरणे आणि सार्वजनिक जीवनातील इतर गोष्टींचा राजकारणात समावेश होतो. त्यामुळे राजकारण ही एक व्यापक बाब असल्याने, ज्याला ज्या अर्थाने राजकारण करावयाचे असते, तसे ते करण्याची त्यास मुभादेखील प्राप्त होत असते. समाजासाठी महत्त्वाचे निर्णय घेणे हा राजकारणाचा पाया असल्याने, साहजिकच, समाजाच्या सहकार्याखेरीज अथवा पाठिंब्याखेरीज राजकारण करता येत नसल्याने अनेकांनी आपल्या राजकारणास समाजकारणाचा मुलामा चढवून सत्तेचे राजकारण केले. त्यामध्ये साहजिकच संघर्षही असतो. हा संघर्ष सत्तेचा असल्याने, दोन गटांमध्ये, विचारसरणींमध्येही तसा संघर्ष अपरिहार्य असतो. अशा संघर्षात मात्र, ज्या समाजासाठी निर्णय घेण्याकरिता राजकारण राबवायचे असते, त्या समाजास फारसे स्थान नसते. त्यामुळे असे संघर्ष लांबूनच न्याहाळत समाज त्याचे विश्लेषण करतो आणि जेव्हा विश्लेषणाहून वेगळेच काही घडताना दिसते, तेव्हा तो एकमेकांस विचारतो, 'राजकारण म्हणजे काय रे भाऊ?'...

सध्या महाराष्ट्रात, म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणात जे काही घडत आहे, ते पाहून त्याचे विश्लेषण करणारा सामान्य माणूस मात्र, पुरता संभ्रमावस्थेत सापडला असल्याने हाच प्रश्न एकमेकांस विचारत असावा. निवडणुका पार पडल्यानंतर पुढे जी काही राजकीय प्रक्रिया सुरू होते, ती बव्हंशी सत्तास्थापनेची असल्याने, सत्तासंघर्ष हा त्या प्रक्रियेचा अपरिहार्य भाग असतो. त्यामुळे, त्या संघर्षात केवळ दोन राजकीय प्रतिस्पर्धी असतात. कधी ते राजकीय पक्षांच्या रूपाने एकमेकांसमोर असतात, तर कधी व्यक्तींच्या नेतृत्वाखालील गटातटांच्या रूपाने परस्परांवर कुरघोडीचे डावपेच आखत असतात. महाराष्ट्राच्या राजकारणात हे नेहमीच घडत आले आहे. ८० टक्के समाजकारणाचा वसा घेत राजकारण करणाऱ्यांच्या एकाहून एक सुरस कथांनी राजकारणाचे भलतेच रंग सध्या उजळताना दिसत आहेत. राजकारण हा केवळ एका क्षेत्रापुरता मर्यादित मुद्दा नाही. कुटुंबातही राजकारण असते, समाजघटकांतही असते, उद्योग-व्यवसायांतही त्याचे स्थान अढळ असते आणि अर्थकारणाचाही राजकारणाशी घट्ट संबंध असतो. म्हणूनच, राजकारणाला असंख्य कंगोरे असतात. केवळ सत्ताकारण किंवा राज्यशास्त्रापुरत्या एका विषयाच्या विळख्यात राजकारण अडकलेले नसते, त्यामुळे, जेव्हा व्यक्ती-व्यक्तींमधील संघर्ष तीव्र होतो, तेव्हाही राजकारणाची नवनवी वळणे दिसू लागतात आणि त्याचा अर्थ शोधणे अनाकलनीय होत जाते. त्यामुळे, जेथे राजकारण नाही, असे क्षेत्र दाखविणे अवघडच असते. तरीही, सत्तेच्या राजकारणाविषयी सर्वांस कमालीचे कुतूहल असते. साहजिकच, ज्याकडे समाज कुतूहलाने पाहतो, ते क्षेत्र अधिक वेगवान असते, तेथील घडामोडी वेगवान असतात. त्याचे पडसाद अन्य समाजजीवनावरही उमटत असतात. त्यातूच नेते, त्यांचे गट आणि प्राबल्याचे संघर्ष सुरू होतात व शक्तिप्रदर्शनासारख्या प्रथा सुरू होऊन प्रभावक्षेत्रे आखण्याची वर्चस्वाची स्पर्धा सुरू होते.

महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे काही आठवड्यांपूर्वी एका वादग्रस्त वक्तव्यामुळे अडचणीत आले आणि त्यांच्या राजकीय कारकीर्दीची कसोटी सुरू झाली. अशा वेळी पाठीराखा भक्कम असेल, तर अशा वादग्रस्त विषयांच्या वादळातून एखाद्यास सहज बाहेर काढले जाते. माणिकराव कोकाटे हे त्या वादग्रस्त वक्तव्यानंतरच्या वादळातून बाहेर पडले आणि तो मुद्दा मागे पडला, तेव्हा त्यांच्या पाठीशी अशी कोणती तरी शक्ती आहे, असा समाजाचा समज पक्का झाला होता, पण त्यापाठोपाठ पुन्हा, विधिमंडळाच्या भर सभागृहात, कामकाज सुरू असताना त्याकडे कानाडोळा करत बाकड्याखाली लपविलेल्या मोबाईमधील खेळात रंगल्याचे त्यांचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसृत झाले आणि कोकाटे नव्या वादळाच्या तडाख्यात सापडले. आपण रमी खेळत नव्हतो, तर विधिमंडळाच्या कामकाजाचे प्रक्षेपण पाहात होतो, तेव्हा मध्येच जाहिरात समोर आली, असा त्यांनी केलेला काही थातुरमातुर खुलासा फारसा पचला नाही, तेव्हा कोकाटे यांना या वादळाची किंमत मोजावी लागणार असे आडाखे राजकारणाच्या चर्चेच्या अड्ड्यांवर बांधले जाऊ लागले, कोकाटे यांची गच्छंती अटळ असल्याच्या आणाभाका घेत कोणी त्यांच्या राजीनाम्यासाठी पिच्छा पुरवू लागले आणि अशाही स्थितीत निश्चल राहून कोकाटे यांनी अखेर शक्तिप्रदर्शनाचा अखेरचा उपाय आखला. आता बहुधा कोकाटे यांच्या शक्तिप्रदर्शनाचा घाट पूर्ण झाला आहे. आपल्या पाठीशी जनसमर्थन आहे, असे भासवत, आपल्या



मंत्रिपदाचा दावा मजबूत करण्याच्या राजकारणातील कुरघोडीच्या खेळाचे आता विश्लेषण सुरू होईल आणि कोकाटे यांच्या कारकीर्दीचे आणखीही काही वादग्रस्त मुद्दे समोर येऊ लागतील. तसेही, १९९५ ते १९९७ या काळात, अल्प उत्पन्नगटातील असल्याचे भासवून राज्य सरकारच्या स्वेच्छाधिकार कोट्यातून घर मिळविल्याच्या आरोपावरून कोकाटे यांच्या विरोधात सुरू असलेल्या प्रदीर्घ सुनावणीचा निकालही वादग्रस्ततेने ग्रासलेल्या याच काळात लागावा आणि त्यामध्ये कोकाटे यांना न्यायालयाने शिक्षादेखील ठोठावावी, हा त्यांच्या राजकारणास मिळालेला जोरदार धक्का ठरला होता. याच घरात त्यांनी व्यवसायदेखील थाटला होता, असेही स्पष्ट झाल्याने या वादग्रस्त व्यक्तिमत्त्वाभोवतीचे वलय अधिकच गडद होऊनही, त्यांच्या सत्तापदास धक्का लागला नव्हता. राजकारण हा सत्तेचा आणि कुरघोडीचा खेळ असल्याने कोकाटे यांना धोबीपछाड देण्याचे अनेक प्रयत्न विरोधकांकडून सुरू आहेत. एकामागून एक वादाच्या भोवऱ्यात सापडलेले कोकाटे त्यातून सुटण्याचा एकाकी प्रयत्न करत असताना, एका भावनेच्या भरात त्यांनी राज्य सरकारलाच भिकारीदेखील ठरविले आणि खुद्द मुख्यमंत्र्यांचीच नाराजी ओढवून घेतली. या साऱ्या गदारोळात स्वच्छ प्रतिमेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्रास होतोय. ते विकासाचे राजकारण करतात. पण अशा मंत्र्यांमुळे त्यांचा त्रास वाढतो. मंत्रिमंडळातील वादग्रस्त आणि सरकारला अडचणीचे ठरणारे, अडचणीत आणणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे स्पष्ट होऊनही कोकाटेंसारख्यांच्या गच्छंतीची भाकिते वर्तविणाऱ्यांना पुढच्या काळाची पंचांगे पाहात नव्या ग्रहस्थितीचा आढावा घेण्याची वेळ आली आहे, हा भाग वेगळा.

याच सरकारातील संजय शिरसाट नावाचे आणखी एक मंत्रीदेखील नोटांनी भरलेल्या बॅगेची ऊब अनुभवत निवांतपणे फोनवर गप्पा मारत असल्याचा एक कथित व्हिडीओदेखील याच काळात समाजमाध्यमांवर फिरू लागला आणि ८० टक्के समाजकारणाचा वसा घेत राजकारण करण्याच्या बांधिलकीवर समाजातून प्रश्नचिन्हे उमटू लागल्यावर, सामान्य माणसाला पुन्हा तोच प्रश्न पडला, 'राजकारण म्हणजे काय रे भाऊ?'...

राजकारण हा कुरघोडीचा खेळ आहे, एवढी बाब आता निश्चित झाली आहे. त्यामुळे या खेळात उतरण्यासाठी काही हत्यारे परजावीच लागतात. आरोप-प्रत्यारोप ही त्यातील हुकमी हत्यारे असतात.

कोणाही नेत्याची, राजकीय पक्षाची प्रतिमा मलिन करण्यासाठी प्रामुख्याने याच हत्याराचा वापर केला जात असतो. जनमानसातील प्रतिमा उद्ध्वस्त करून कुरघोडीच्या राजकारणात प्रतिस्पर्ध्यास चीत करता येते हा राजकारणातील सर्वसाधारण समज असला, तरी आजकाल आरोप-प्रत्यारोपांच्या खेळाचे गांभीर्यच कमी झाले आहे. कोणीही कोणावरही कोणतेही आरोप करावेत आणि तात्पुरते वादळ उठवून त्याचा तात्कालिक फायदा घेण्याचा प्रयत्न करावा हे सर्रास होत असले, तरी तेच आरोप फिरून समोरूनही होऊ लागले, की ही हत्यारे आपोआप म्यान होतात, असाच सर्वसाधारण समाजाचा अनुभव आहे. गेल्या काही दशकांत राजकारणातील अनेकांवर असंख्य आरोपांची प्रच्छन्न चिखलफेक झाली. असे काही घडताना दिसू लागले, की राजकारणात रस असलेली जनता उत्सुकतेने पुढे काय होणार याकडे डोळे लावून बसते. तोवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुटतच असतात आणि अचानक कोणीतरी सगळी हवा काढून टाकणारे एखादे वाक्य उच्चारतो. आम्हाला तोंड उघडायला लावू नका, आम्ही तोंड उघडले तर तुम्हाला तोंड लपवायला जागा उरणार नाही, असा पठडीबाज इशारा उच्चारला गेला, की आपोआप सारे काही शांत होऊ लागते. सामान्य जनता मात्र, ही तोंडे उघडण्याची व कोण कोणत्या बिळात तोंड लपवून बसते याची वाट पाहात बसते. तोंड उघडले तर लपायला जागा राहणार नाही हा इशारा म्हणजे या खेळात शह देण्याचा एक हमखास उपाय असल्याचे आता निर्विवादपणे स्पष्ट झाले आहे. अलिकडेच, नोटांच्या बॅगेची ऊब अनुभवतानाचा संजय शिरसाट यांचा कथित व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसृत झाल्यानंतर त्यांनीदेखील हाच उपाय वापरलेला दिसतो. शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी शिरसाट यांचा तो कथित व्हिडीओ प्रसृत करून राळ उडवून दिल्यानंतर, शिरसाट यांनी संजय राऊत यांना हाच इशारा दिला होता. आम्ही तोंड उघडले तर संपूर्ण महाराष्ट्रात तुमची बेअब्रू होईल असा इशारा देत शिरसाट यांनी कुरघोडीचे अस्त्र वापरले, तर काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांच्या घरावर दगड फेकू नयेत असा इशारा देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाच्या नेत्यांस गप्प राहण्याचा सल्ला दिला. कोणी व्हिडीओ प्रसृत करू लागले, तर कोणी आपल्याकडे सीडी असल्याचा आरोप करत प्रकरणे बाहेर काढण्याच्या धमक्या देऊ लागले. सामान्य माणूस मात्र, या प्रकाराकडे अचंबित होऊन पाहात राहिला आहे. एकमेकांच्या विरोधात एवढे सज्जड पुरावे असताना, एखाद्यास कायमचे तोंड लपवावे लागेल एवढी भक्कम माहिती हाती असताना, केवळ एकमेकांस इशारे देणारे हे राजकारण एकदाचा सोक्षमोक्ष का लावत नाही, अशा विचाराने तो संभ्रमित झाला आहे आणि त्याला प्रश्न पडला आहे, राजकारण म्हणजे काय रे भाऊ?...

अशा एकूण परिस्थितीने कळस गाठला, की त्यास राजकारणाची अधोगती झाली असे म्हटले जाते. या अधोगतीची अनेक कारणे असली तरी सत्तास्पर्धा हेच मुख्य कारण असते, हेही आता स्पष्ट झाले आहे. पक्षांतील फूट, गट, स्पर्धा, वैयक्तिक वैर, असे अनेक घटक एकत्र येऊन एकमेकांचे पाय ओढण्याचा खेळ खेळू लागतात आणि त्यात ज्याला यश मिळते, तो साहजिकच प्रबळ ठरतो. राजकारणातील या अधोगतीच्या प्रवासाचे पहिले श्रेय कोणास द्यावयाचे यावरून वेगवेगळे मतप्रवाह समोर आलेले दिसतात. आधी व्यक्तींमधील नैतिकतेची अधोगती होते आणि त्यातून गट, पक्ष आणि व्यापकपणे राजकारणाची अधोगती होते, हे या प्रवासाचे टप्पे आहेत. महाराष्ट्राचे राजकारण आजच्या घडीला यापैकी नेमके कोणत्या टप्प्यावर आहे, असाही प्रश्न आज सामान्य माणसास भेडसावत असेल यात शंका नाही. हे केवळ महाराष्ट्रातच घडते आहे असेही नाही. शेजारच्या मध्य प्रदेश, कर्नाटकातही सीडी, पेन ड्राईव्ह, हनी ट्रॅपच्या आरोपांनी राजकारणास विळखा घातला आहे. अशा वेळी, दूध का दूध करण्याचे आव्हान देणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पवित्रा राजकारणातला नव्या औत्सुक्याचा विषय ठरतो. हनी ट्रॅप नावाच्या नव्या वादाने राजकारण ढवळून निघालेले असतानाच, अजित पवार यांनी मात्र, या वादाचे पुरावे जाहीर करण्याचे आव्हान दिले आहे. अशा आरोपांतून केवळ धमक्या देणे बंद करा आणि ज्यांच्याकडे पेन ड्राईव्ह आहे, व्हिडीओ आहेत, त्यांनी ते जनतेसमोर आणावेत असे स्पष्ट आव्हान अजित पवार यांनी दिले आहे. या सामन्याचा निर्णय अखेर जनताच घेणार आहे, याचे भान कोठे तरी जिवंत आहे, ही समाधानाची बाब नव्हे काय? तसे झाले नाही, तर राजकारण हा जनतेस मूर्ख बनविण्याचा धंदा आहे या समजुतीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता अधिक! ▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### पुन्हा दीदीच्या अश्रूंची नौटंकी

पश्चिम बंगालमधील राजकारण हे गेल्या काही वर्षांत एक विचित्र, गुंतागुंतीचे आणि राष्ट्रीय सुरक्षेला सतत आव्हान देणारे क्षेत्र ठरले आहे. ममता बॅनर्जीच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसने ज्या प्रकारे राजकारणात धर्म, जाती आणि परकीय घुसखोरीचा वापर करून मतांचे समीकरण पक्के केले, ती एक गंभीर राष्ट्रीय शोकांतिका आहे. पण सध्या केंद्र सरकारच्या कठोर भूमिकेमुळे या सर्व समीकरणांना सुरुंग लागला असून, त्याचे फलित म्हणजे ममता बॅनर्जींची सध्या दिसणारी अस्वस्थता, बडबड आणि नाट्यमय अश्रू.



अलिकडेच जेव्हा केंद्र सरकारने घुसखोर रोहिंग्या आणि बांगलादेशी नागरिकांच्या विरुद्ध धोरणात्मक पावले उचलायला सुरुवात केली, त्यावेळी बंगालमधील सत्ताधाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकली. याच भूमीवर त्यांनी 'घुसखोर म्हणजे माझं मतबँक' असं गुप्त समीकरण तयार केलं होतं. संदेशखालीपासून कोलकात्याच्या उपनगरांपर्यंत लाखोंच्या संख्येने घुसखोरी झाली. त्यांचे नाव बदलून, कागदपत्रे बनवून त्यांना देशाचा नागरिक बनवण्यात आले आणि मतदानासाठी वापरले गेले. आज जेव्हा केंद्र सरकार राष्ट्रीय नागरिक नोंदणी, नागरिकत्व दुरुस्ती कायदा यासारख्या उपाययोजना राबवते आहे, तेव्हा या साऱ्या घुसखोर 'मतदारां'च्या भवितव्यासमवेत ममतांचे राजकीय भविष्यही डळमळीत झाले आहे. आणि म्हणूनच ममता आज अश्रूंचा प्रयोग करत आहेत. एकीकडे त्या केंद्र सरकारवर हल्ला करत आहेत आणि दुसरीकडे स्वतःला बळी दाखवत आहेत. हे सारे राजकारण नव्हे काय? वास्तविक, पश्चिम बंगालमधील परिस्थिती म्हणजे 'राष्ट्रविरोधकांचे सुरक्षित आश्रयस्थान' झाले आहे. बंगालच्या सीमाभागांतून सतत बांगलादेशी घुसखोर भारतात येत आहेत आणि त्यात काही रोहिंग्या दहशतवाद्यांचीही घुसखोरी होत असल्याचे गुप्तचर विभागाचे दाखले आहेत. या सर्वांचा थेट उपयोग केवळ राजकीय फायद्यासाठी केला गेला आहे. ममतांचे म्हणणे असते, ''हे सगळं मानवतावादासाठी आहे.'' पण प्रत्यक्षात हा मतवाद आहे. माणुसकीच्या मुखवट्यामागे लपलेला स्वार्थाचा कुरूप चेहरा हेच ममतांचे खरे रूप आहे. जेव्हा असाम, त्रिपुरा आणि आता बंगालमध्ये सुद्धा सीएए-एनआरसी राबवण्याची तयारी सुरू झाली, तेव्हा ममतांनी 'दंगली, आंदोलने आणि स्वतःवर अन्याय झाल्याचे नाटक' सुरू केले. हे रोहिंग्यांचे डोळे आहेत की ममतांचे अश्रू हे सामान्य नागरिकालाही आता समजायला लागले आहे.

आज बंगालमधील सामान्य जनतेमध्ये रोष आहे. शांततामय सहअस्तित्वाच्या भूमीत आज धार्मिक ध्रुवीकरण, बांगलादेशी गँग्सचा त्रास, हिंदूंवरील अत्याचार आणि महिला असुरक्षा या गोष्टी सामान्य झाल्या आहेत. पोलिस फक्त ममतांच्या कार्यकर्त्यांसाठी काम करत आहेत आणि जेवढे काही सरकार चालते ते मुस्लिम मतांसाठी.

पण याचा शेवट आज दिसतो आहे. कारण केंद्र सरकार आता एका स्पष्ट, राष्ट्रहिताच्या भूमिकेवर उभे आहे. सीएएमुळे पीडितांना संरक्षण मिळेल, एनआरसीमुळे घुसखोरांवर कारवाई होईल आणि सीमांचे संरक्षण होईल. याचाच अर्थ ममतांच्या 'मतबँकेवर' कुऱ्हाड पडणार आहे. आणि म्हणूनच त्या नाटक करत आहेत. हे ''माझ्यावर अन्याय होतोय'' वगैरे रडगाणे म्हणजे केवळ वाचवण्याचा अपयशी प्रयत्न आहे. आज ममता बॅनर्जीच्या अश्रूंचा खरा अर्थ लोकांनी समजायला हवा. हे अश्रू केवळ घुसखोरांचे हक्क हिरावले म्हणून नव्हे, तर स्वतःची सत्ता, स्वतःचा मतबँक आणि स्वतःच्या फायद्याचे राजकारण कोसळतेय म्हणून आहेत. ही एक राजकीय नौटंकी आहे, जी आपल्या राष्ट्रीय सुरक्षेशी, सामाजिक समतेशी आणि प्रामाणिक नागरिकांच्या हक्कांशी प्रतारणा करते आहे.

शेवटी एवढंच की, पश्चिम बंगालमधील राजकारण हे देशातील सर्वांत धोकादायक वळणावर पोहोचले आहे. ममतांची ढोंगबाजी आता उघडी पडते आहे. रोहिंग्या, बांगलादेशी घुसखोर, धार्मिक तुष्टीकरण आणि दडपशाही यांच्या आधारे उभा केलेला सत्तेचा बुरुज आता कोसळताना दिसतो आहे. आणि म्हणूनच या ''ममताच्या अश्रूंना'' दया न वाटता सावध व्हा, कारण हे अश्रू देशासाठी नाहीत, फक्त स्वतःच्या सिंहासनासाठी आहेत.

**प्रा. भागवत भांगे**/नागपूर

●● ●●

### म्हातारपण नको देऊ गा देवा!

लहानपण देगा देवा अशी मागणी सगळेच करतात. लहानपण हे निरागस असते. या वयात समज नसते. कुठलाही हट्ट हा खपवून घेतला जातो. लहान मुलांना फुलासारखे जपले जाते. त्यांचे लाड पुरवले जातात. आजच्या परिस्थितीत हे पण अवघड होऊन बसले आहे. जिथे आई-वडील नोकरीवर असतात किंवा कामाला जातात. ज्या मुलांची आई घरी असते त्या मुलांचे बालपण हे सुखात जाऊ शकते. ज्या घरांमध्ये आजी-आजोबा असतात. तिथेच नातवांचे खरे लाड, कौतुक होत असतात. फाजील लाड वडील माणसे खपवून घेत नाहीत. आज हे चित्र दुर्मिळ होत चालले आहे. यास कारण विभक्त कुटुंब पद्धती. नोकरी निमित्ताने,अर्थार्जन करण्यासाठी दोघांनाही बाहेर पडावे लागते आहे. यामुळे मुलांचे संगोपन हा विषय दिवसेंदिवस कठीण होत चालला आहे. मुलं व कौटुंबिक जबाबदारी नको असल्याने लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याच्या प्रकारात वाढ होताना दिसून येत आहे. यामुळे कुटुंब व्यवस्था डळमळीत होत आहे. दोघेही नोकरी करणाऱ्या दाम्पत्यांना मुलांची अडचण वाटते आहे. सासू-सासरे, आई - वडील नकोसे वाटतात. असे चित्र मोठ मोठ्या शहरांमध्ये, फ्लॅट संस्कृतीमध्ये पाहायला मिळते आहे. अजूनतरी खेडे विभागात, ग्रामीण भागात हे लोण पोहचलेले नाही, ही समाधानाची बाब ठरते आहे.

जुनी पिढी हेल्थ इज वेल्थ समजून असत. आज हेल्थकडे दुर्लक्ष करून वेल्थकडे धाव घेताना नवीन पिढी दिसून येत आहे. यामुळे शारीरिक व्यायामाचा प्रकार दैनंदिन जीवनातून बाद झाला आहे. यासाठी हेल्थ क्लब, फिटनेस क्लबचा बाजार मांडला जातो आहे. त्यांची फी अव्वाच्या सव्वा असते. ती सामान्य माणसांच्या आवाक्यात नसते. यात भर म्हणून सप्लिमेंटरी फूड, प्रोटीनयुक्त आहार घेण्यास सांगतात. याकडे तरुणाईचा जास्त कल दिसून येतो आहे. याचे बरे वाईट परिणाम शरीरावर होत असतात. याकडे दुर्लक्ष करून कसे चालणार आहे?

म्हातारपणात शरीर साथ देत नाही. डोके, कान, डोळे, हातपाय इ. साथ देत नाही. आज बहुतांश कुटुंबांत एक किंवा दोनच मुले असतात. सुशिक्षित व उच्च शिक्षित कुटुंबातील मुले नोकरी निमित्ताने बाहेरगावी, परदेशात असतात. याचकारणाने उतारवयात परत एकटेच राहण्याची पाळी पालक वर्गावर येत आहे. यामुळे उतारपणात एकटेपणाची जाणीव त्यांना अस्वस्थ करते आहे. त्यांची काळजी घेणारे कुणीही राहत नाही. ग्रामीण भागात आजही अनेकजण अनेकांना ओळखतात. माणुसकी आजही खेडेगावात जपली जाते आहे. या उलट शहरातील परिस्थिती पाहायला मिळते आहे. शेजारचे पाजारचे एकमेकांना ओळखत सुद्धा नाहीत.

बहुतांश सरकारी दवाखाने हे नरक यातना देणारे ठरतात. यात सुधारणा करण्याची गरज सरकारला वाटत नाही. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असते ते कसेतरी खाजगी दवाखान्याची वाट धरतात. आजच्या काळात मेडिकल इन्शुरन्स, कॅशलेस उपचार मिळणाऱ्या दवाखान्यावर पेशंटचा जास्त भर आढळून येतो. याची खात्री करून घेऊनच पुढचे पाऊल उचलले जाते. अशा दवाखान्यात पेशंट भरती झाला की डॉक्टर लोक त्या पेशंटच्या खात्यात पैसे शिल्लक असेपर्यंत चांगली काळजी घेतात. मग काहीतरी कारणे सांगून पेशंटला घेऊन जाण्यास भाग पाडतात. असा सर्व प्रकार सुरू झालेला आहे. म्हातारपणी ज्याचे आरोग्य सुदृढ असते तो खरा श्रीमंत असतो. कारण या वयात दाताने आपले काम थांबवलेले असते. दृष्टीने साथ देणे कमी केलेले असते. कानाने कुणाच्या भानगडीत पडायचे नाही असे ठरविले असते. हातापायाने जास्त श्रम करणे सोडलेले असते. या वयात एकतर डोके खूप चालते किंवा काहीच काम करीत नाही. जिभेचे चोचले या वयात पुरवणे शक्य नसते. शरीरातील पोषक घटकांचे, जीवनसत्त्वांचे संतुलन बिघडलेले असते. असा सर्व शरीराचा जांगडगुत्ता



झालेला असतो. म्हणून म्हातारपण नकोसे होते. आज सर्वत्र पैशाचा बोलबाला दिसून येतो आहे. नातेवाईक, सगेसोयरे पैसेवाले असतील तरच त्यांची विचारपूस करतात. नाहीतर कुणी कुणाला विचारण्याच्या, मदत करण्याच्या स्थितीत आढळून येत नसल्याने नको ते म्हातारपण अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे.

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

●● ●●

### मतदारयादी पुनरीक्षण आवश्यकच

मतदार पुनरीक्षण या विषयावर काँग्रेसच्या ताटाखालचे मांजर असलेले काही बुद्धिजीवी, ढोंगी धर्मनिरपेक्षतावादी आणि मोदीद्वेषाने पिसाळलेले पत्रकार, वादग्रस्त लेख लिहून जनतेची दिशाभूल करत आहेत. संवैधानिक आणि स्वायत्त संस्था असलेल्या भारतीय निवडणूक आयोगाच्या एकूण संवैधानिक अधिकार, कर्तव्ये आणि कामकाज पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करत आहेत. भारतीय निवडणूक आयोगाने संविधानात दिलेल्या अधिकारांचा वापर करून भारतीय मतदारांचे पुनरीक्षण करण्याच्या निर्णयावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्षांसह, इंडिया आघाडीचे इतर नेते मोदीविरोधाने एवढे पछाडलेले आहेत की आपण काय बोलतो आहोत, याचेही भान त्यांना राहिलेले नाही.

निवडणूक आयोगाने बिहारमधील सर्व महत्त्वाच्या राजकीय पक्षांनी नेमस्त केलेल्या, जवळपास साठ हजार बुथ लेव्हल एजंट्सना आधी पुनरीक्षण कसे करायचे याबद्दल सविस्तर प्रशिक्षण दिले होते. या प्रशिक्षणाबद्दल सर्वच प्रतिनिधींनी आनंद आणि समाधान व्यक्त केले. पुनरीक्षणाच्या कामातील प्रत्येक पायरीवर निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींबरोबरच राजकीय पक्षांचे प्रशिक्षित नेमस्त प्रतिनिधीही उपस्थित होते. या संपूर्ण पारदर्शक प्रक्रियेला बिहारमधील ९८ टक्क्यांच्या वर मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक आयोग अधिकृत भारतीय नागरिक असलेल्या सर्व मतदारांची यादी जुलै २०२५ अखेर जाहीर करणार आहे. यानंतर एखाद्या मतदाराची यादीबाबत काही तक्रार असेल, काही बदल असतील तर ते सुचवण्यासाठी तब्बल एक महिन्याची मुदत दिली आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या माहितीनुसार मृत मतदार, बिहारमधून इतर राज्यांत विस्थापित झालेले मतदार, दोन ठिकाणी नोंद असलेले मतदार आणि बनावट आधार कार्ड बनवून भारतीय निवडणुकीत मतदान करणारे घुसखोर मतदार यांची संख्या पन्नास लाखांच्या वर आहे. अशा मतदारांची नावे मतदारयादीत ठेवणे हे संविधानाच्या विरुद्ध आहे, संविधानाचा अपमान आहे. बिहारमधील सीमावर्ती चार जिल्ह्यांमधील आधारकार्डचे प्रमाण १२५ टक्क्यांच्या वर आहे. म्हणजे शंभर लोकांमध्ये १२५ आधार कार्ड असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे आणि ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे. त्याची दखल घ्यायला नको? काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे हेच गट मतदार आहेत का? आजवर काँग्रेस आणि तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी पक्ष देशातील बहुसंख्य समाजाच्या मागे कधीच उभे राहिले नाहीत. मात्र देशद्रोही, अवैध घुसखोर, अतिरेकी, भ्रष्टाचाऱ्यांच्या मागे मात्र काँग्रेस सदैव बचावासाठी उभी का राहते? वास्तविक सर्व राजकीय पक्षांनी या प्रक्रियेचे स्वागत करून त्याला सकारात्मक सहकार्य करायला हवे होते. पण आपल्या देशात सगळे उलटेच!

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीबद्दल मुंबई उच्च न्यायालयात गेलेल्या काँग्रेसचे न्यायालयाने काढलेले वाभाडे काँग्रेस विसरली आहे का? त्याचबरोबर ईव्हीएमबाबत जवळपास चाळीसहून जास्त वेळा न्यायालयात गेलेल्या काँग्रेस आणि इतर राजकीय पक्षांनाही न्यायालयाने काय सुनावले याकडेही याकडे काँग्रेस सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, बिहारमधील मतदारयादी पुनरीक्षणाबद्दल सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने आयोगाच्या संवैधानिक अधिकार आणि कर्तव्यात हस्तक्षेप करण्यास साफ नकार दिला. याची पुढील सुनावणी येत्या २८ जुलै रोजी होणार आहे. त्याआधीच विरोधी पक्षनेते दबावतंत्राचा वापर करत आहेत. निवडणूक आयोगाने संपूर्ण देशात मतदारयादीचे पुनरीक्षण करून अवैध मतदारांची नावे वगळण्याबरोबरच केंद्र सरकारने संबंधित घुसखोरांना देशनिकाला दिला पाहिजे.

शेवटी काय तर आपण जिंकू तेथे सगळे काही उत्तम आणि आपण हारलो तेथे सगळे काही वाईट, मात्र आपल्यात काहीही दोष नाही अशी धारणा असलेल्या राजकीय पक्षांचे भवितव्य काय असेल ते सांगण्याचीही गरज नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

### नरेंद्र मोदी : वर्तमानातील चाणक्य

उत्तम राज्यकारभार कसा चालवावा याचे ज्ञान 'चाणक्य'नीतीतून मिळते आणि नरेंद्र मोदी यांची कार्यशैली या 'चाणक्य'नीतीची सदोदित आठवण करून देणारी आहे. सलग पंतप्रधानपदी राहण्याच्या विक्रमात नरेंद्र मोदी यांनी इंदिरा गांधी यांना मागे टाकले असून जवाहरलाल नेहरू यांचा विक्रमही ते मोडीत काढू शकतील. इंदिरा गांधी यांनी आणिबाणी लादून लोकसभा निवडणूक दोन वर्षे समोर ढकलली आणि सत्ता उपभोगली हे लोकशाहीच्या अभ्यासकांनी लक्षात घ्यावे. अन्यथा इंदिरा गांधी यांचा विक्रम यापूर्वीच मागे पडला असता. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोइझ्झू यांच्याशी थेट विरोधी भूमिका न घेता मोदींनी खुल्या मोहम्मदीला ताळ्यावर आणले. चीनच्या कच्छपी लागून मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोइझ्झू यांनी भारतविरोधी जहाल भूमिका घेतली. मालदीवची अर्थव्यवस्था मुख्यतः पर्यटनावर आणि त्यातही भारतीय पर्यटकांवर आधारित आहे.

मोदींनी स्वतःचे समुद्र किनारी पर्यटनाचे एक छायाचित्र जाहीर केले की लगेच मालदीवला जाणारा भारतीय पर्यटकांचा ओघ आटला आणि मालदीवच्या अर्थव्यवस्थेला हेलकावे बसू लागले. आता त्याच मालदीवच्या अध्यक्षांनी नरेंद्र मोदी यांना मालदीव येथे पाहुणे म्हणून निमंत्रित केले आहे. पावसाळा संपल्यावर झेलम, सतलज नद्यांचे पाणी न मिळाल्याने पाकिस्तानला ज्यावेळी पाणीटंचाई जाणवेल त्यावेळी पाकिस्तानचे तुर्रमखान राज्यकर्ते भारतासमोर हात बांधून, मान झुकवून उभे राहतील हा दिवस फार दूर नाही.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

●● ●●

### तरुण पिढी व्यसनाधीन होते तेव्हा...

मनुष्य या विश्वातील एक अभिनव आणि अद्वितीय निर्मिती आहेत. तुमच्यासारखे फक्त तुम्हीच आहात. ही तुमच्या आयुष्याची खरी किंमत आहे. शून्यातून विश्व निर्माण करण्याची ताकद फक्त मानवातच आहे. ध्येय नसलेली माणसे साबणाच्या फेसासारखी असतात. काही क्षणापूर्वी ती दिसतात आणि काही क्षणानंतर ती नाहीशी होतात, असे महात्मा फुले म्हणतात. अजूनही वेळ गेलेली नाही. उद्याचा दिवस माझा असेल या सकारात्मकतेच्या दृष्टीने प्रेरित होऊन विचार बदलण्याची गरज आहे. मानवाचा जन्म झाल्यानंतर बालपण हे हसत खेळत जाते. परंतु शिक्षण घेत असताना घरातील आई-वडिलांचे संस्कार हे त्या मुलांवर अथवा मुलींवर होत असतात. त्याप्रमाणे लहानाचा तो मोठा होत जातो. पण शिक्षण घेत असताना त्याला मिळालेली संगत यावर सुद्धा बरेच काही अवलंबून असते. आजच्या तरुण पिढीची वाटचाल व्यसनाधीनतेकडे होते तेव्हा मात्र सर्वत्र निराशा होते. शरीराला घातक पदार्थांचे सेवन हे कमी वयातील मुलांना वाईट मार्गाने जाण्याची सवय लागलेली असल्याचे दिसून येत आहे. आई-वडील मोठ्या आशाआकांक्षा घेऊन आपल्या मुलांकडे बघत असतात. जेव्हा त्यांच्या मुलांचे कारनामे त्यांना माहीत होतात, तेव्हा मात्र त्यांच्या पायाखालची जमीन सरकलेली असते. आई-वडील आपल्याला जन्म देतात. लहानाचे मोठे करतात. स्वत:कडे दुर्लक्ष करून मुलाबाळांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यादृष्टीने ते आपले हित पाहतात. परंतु आजच्या युगात मात्र भलतेच होतानाचे चित्र सर्वत्र उमटून येत आहेत. तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारच तरुणांना जागे करू शकतात. महापुरुषांना आदर्श मानून त्यांच्या विचारांवर चालण्याची गरज आजच्या युवकांवर आली आहे. त्यामुळे नव्या वर्षात आपण सर्वांनी निश्चय करून व्यसनांपासून लांब राहावे जेणेकरून उद्याची तरुण पिढी चांगली राहील.

ऊठ तरुणा, जागा हो, व्यसनांपासून दूर हो या उक्तीप्रमाणे त्याने जीवन जगणे गरजेचे आहे. सरकारने व्यसनमुक्तीसाठी दवाखाने काढलीत परंतु त्याचा लाभ किती प्रमाणात झाला हा संशोधनाचा विषय आहे. युवकांनी शिकाल तरचं टिकाल या ओळी मनावर बिंबवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**ललित प्रभाकर नगराळे**/८९७५६२१९५९

●● ●●

### नागपुरातील एकांकिका बंद का झाल्या?

माझ्या लहानपणी नागपुरात अनेक नाट्य कलाकार घडविणाऱ्या संस्था होत्या. रंगतरंग, अमॅच्युअर आर्टिस्ट, कलास्वानंद, बालरंजन व अशा अनेक संस्था मोठी नाटके किंवा बाल नाटके घेऊन धनवटे रंगमंदिर येथे किंवा वसंतराव देशपांडे सभागृह येथे प्रयोग सादर करायचे. मला आठवते सी. पी. बेरार कॉलेजमध्ये दोन नाटके ''चोरा येशील कधी परतून'' व ''झाली हवालदिल राजधानी'' ही दोन नाटके तुफान गर्दीत झाली होती. तिसऱ्या घंटेची आम्ही आतुरतेने वाट बघत असू. रंगतरंग संस्थेने ''चिलया बाळ'' नावाचे नाटक सादर करायचे ठरवले होते. त्यात मला 'चिलया बाळ'ची भूमिका देण्यात आली होती. त्याची तालीमसुद्धा सुरू होती परंतु काही कारणास्तव ते सादर होऊ शकले नाही. त्यावेळी मी खूप निराश झालो होतो. तसेच दूरदर्शन नवीन आले



होते तेव्हाही अनेक संस्थांची नाटके त्यावर प्रसारित होत असे. शाळकरी मुलांना अभिनयाचे धडे देणे व त्यातूनच मराठी भाषा समृद्धी, संवाद कला, सादरीकरण, वेळेचे ताळमेळ आणि मुख्य म्हणजे पाठांतर इत्यादी गुणांचा वर्षाव जणू मुलांवर होत असे आणि पालकही आपल्या पाल्याला कौतुकाने नाटकात भाग घ्यायला पाठवत असत. एकूणच रंगभूमी सेवा अनेक ज्येष्ठ कलाकार करत असत. कालांतराने नाट्य सादरीकरणाची शैली बदलली. आता तर सिनेमास्टाईल नाटके सादर होत आहेत. आपण नाटक बघतोय की सिनेमा हेच कळत नाही. तरी पण नाट्यचळवळ नागपुरात ज्येष्ठ रंगकर्मी संजय भाकरे यांच्या सं. भा. फाऊंडेशनच्या वतीने निरंतर सुरू होते. अनेक लेखक, दिग्दर्शक व कलाकार मागील काही वर्षात घडले परंतु हल्ली संभाची नाट्यचळवळ बंद झाल्यासारखी दिसतेय. इतक्यात एकही नाटक आले नाही. यात मुलांची उदासीनता आहे की कसदार लेखकांचा अभाव की रसिकांची पाठ की अयोग्य वातावरण. चांगली नाट्यसंहिता व चांगले कलाकार घडविण्याचे हे एक साधन होते आणि भाकरे ते इमानेइतबारे करत होते. ही नाट्यचळवळ त्यांनी पुन्हा सुरू करावी असे वाटते. नव्याने नाट्य सादरीकरण जरी अस्तित्वात असले तरी प्रत्यक्ष संवादफेकीतून जो आविष्कार दिसतो त्याची मजा काही औरच. मुलांना स्पर्धात्मक युगात ढकलताना काही वेळ मनोरंजासाठी व त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी असावा असाही विचार पालकांनी करण्याची गरज आहे. त्याकरिता नागपूरात जिथे कुठे अशा नाट्यचळवळी चालताता त्याला प्रोत्साहन देणे की काळाची गरज आहे अन्यथा 'नाटक' हा कलाप्रकार लुप्त होऊन जाईल. ▮

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मृत झालेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबास आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ जुलै -**
लोहगाव (ता. तुळजापूर) येथील शेतकरी बब्रुवान खटके यांचा काही दिवसांपूर्वी बैलगाडीच्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होत दि.२७ जुलै रोजी तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या वतीने ११ हजार रूपयांची आर्थिक मदत त्यांच्या



कुटुंबाला प्रदान करण्यात आली.

या मदत वितरण कार्यक्रमास तुळजापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. आशिष सोनटक्के, संचालक सिद्धेश्वर कोरे, भाजपचे विलास राठोड, बाळासाहेब पाटील, प्रशांत देशमुख, तसेच सुनील पाटील, सातलिंग पाटील, शशिकांत खटके, दिलीप वाघमोडे, संजय खताळ पाटील, माणिक बनसोडे, बसवराज सुरवसे, शशिकांत नागीले, प्रेमनाथ मारेकर, वीरभद्र मेंडके, मारुती बनसोडे, सचिन शिंगाडे, योगेश वाघमोडे, आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### पोलीस निरीक्षक घुगे यांचा विशेष सन्मान

**अणदूर, दि.२७ जुलै -**
अणदूरचे सुपुत्र तथा सांगोला पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांचा सोलापूरचे ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्या हस्ते यात्रा काळात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन कौतुक केले जात आहे. सांगोला पोलीस स्टेशनचे कर्तबगार वरिष्ठ पोलीस अधिकारी विनोद घुगे यांनी आषाढी वारी काळात पंढरपूर या ठिकाणी विशेष कार्य सेवा बजावली. वेगळा आदर्श निर्माण केल्याने त्यांना गौरवण्यात आले. त्यांना विशेष प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन होत असून अणदूर येथे ही अभिनंदन व कौतुक केले जात आहे.



### कारगिल दिनानिमित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**उमरगा, दि.२७ जुलै -**
भारतीय आजी-माजी सैनिक संघटना शाखा माडज यांच्या वतीने कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर कारगिल युद्धात वीरमरण आलेल्या शूर जवानांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या बलिदानाचे स्मरण करण्यात आले. कार्यक्रमानिमित्त इयत्ता दहावीमध्ये उत्तम यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी गावातील नागरिक, शिक्षक, विद्यार्थी व माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### टाकाऊ वस्तु पासून विद्यार्थ्यांनी तयार केले डस्टर

**लोहारा, दि.२७ जुलै -**
लोहारा शहरातील हायस्कूल लोहारा या शाळेतील इ.७ वीच्या विद्यार्थ्यांनी डस्टर तयार करून नाविन्यपूर्ण व पर्यावरण पूरक शिकवणीचा अनुभव घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना हस्तकलेची धडे मिळाले. कला शिक्षणातून सृजनशीलता पर्यावरण जागृती आणि कौशल्य विकास याची मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी डस्टर तयार करताना शिवणकामाचे तंत्र आत्मसात केले. शालेय जीवनात मुलांना त्याचा आनंद मिळाला. याप्रमाणे प्रशालेमध्ये नवीन डस्टर विकत घ्यायची गरज नाही. टाकाऊ कपड्यापासून फळा पुसण्यासाठी डस्टर तयार करणे या उपक्रमातून नवनिर्मिती, बौद्धिक व मानसिक आनंद मिळाला. यामुळे हस्तकलेचे कौशल्य मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक डी.एम. पोतदार, व्यंकटेश पोतदार, वैजनाथ पाटील, यांनी मुलांना मार्गदर्शन केले.



### संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये कारगिल विजय दिवस साजरा

**परंडा, दि.२७ जुलै -**
येथील संत मीरा पब्लिक स्कूल येथे 'कारगिल विजय दिवस मोठ्या उत्साहात व देशभक्ती पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी स्वातंत्र्यसैनिक, प्रत्यक्ष कारगिल युद्धात सहभागी असणारे शूर सैनिक मेजर संभाजी पाटील हे होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून प्रत्यक्ष परिस्थिती उपस्थितांसमोर मंडली. बोलत असताना त्यांना भावना अनावर झाल्या होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागवली आणि वीर जवानांच्या त्यागाचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्य संतोष भांडवलकर यांनी आपल्या भाषणातून कारगिल विजय दिनाचा इतिहास व महत्व सांगितले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी नांगरे यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक, विभागप्रमुख व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# धाराशिव जिल्ह्यात पर्यटनातून रोजगार निर्मितीला मिळणार चालना



### २० ऑगस्टपर्यंत एकत्रित विकास आराखडा तयार होणार : आ. राणादादा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै -**
धाराशिव जिल्ह्याच्या ऐतिहासिक आणि धार्मिक पर्यटन वारशाचा विकास करत स्थानिक रोजगार निर्मितीला चालना देण्याचा निर्धार 'मित्र' संस्थेचे उपाध्यक्ष व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत जिल्ह्यातील प्रमुख पर्यटनस्थळांचा एकत्रित प्रारूप विकास आराखडा तयार केला जाणार असल्याची माहिती त्यांनी नुकत्याच पार पडलेल्या प्रशासनिक बैठकीत दिली.

धाराशिव जिल्ह्याला महाराष्ट्राच्या कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे शक्तिपीठ, तसेच संत गोरोबाकाका यांचे भक्तिपीठ लाभले आहे. यासह नळदुर्ग, येडशी, तेर, येरमाळा यांसारख्या ऐतिहासिक, धार्मिक व निसर्गसंपन्न स्थळांचा एकात्मिक विकास करण्याचे नियोजन आखले आहे.

या विकास आराखड्यांत नळदुर्ग किल्ला, बसवसृष्टी, वसंतराव नाईक स्मारक, 'रोप-वे', 'हॉट एअर बलून' यांसारख्या साहसी पर्यटन उपक्रमांचा समावेश केला जाणार आहे.

येडशी येथील रामलिंग अभयारण्य, श्री क्षेत्र रामलिंग मंदिर, डाक बंगला, जुनी रेल्वे लाइन, आणि विठ्ठलवाडी गावाचे ऐतिहासिक पुनर्रचितीकरण देखील या आराखड्यात आहे.

आई तुळजाभवानी देवीची धाकटी बहीण म्हणून ख्याती असलेल्या श्री क्षेत्र येडेश्वरी देवी मंदिर परिसराचा विकास भूसंपादनासह करण्यात येणार असून, 'तगर'च्या प्राचीन वैभवाची झळाळी पुन्हा उजळवली जाणार आहे. तसेच राज्यातील सर्वात प्राचीन त्रिविक्रम मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.

याप्रसंगी पार पडलेल्या बैठकीस तुळजाभवानी मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश अहिरराव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, तहसीलदार अरविंद बोळंगे, अभिजीत जगताप, पर्यटन विभागाच्या जया वहाने, आणि सल्लागार नेहा शितोळे यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

प्रत्येक पर्यटनस्थळाचा स्वतंत्र विकास आराखडा तयार करून जिल्ह्याच्या पर्यटन व्यवसायाला चालना देत स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, असा विश्वासही यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## माऊली प्रतिष्ठानच्या वतीने आरो वॉटर फिल्टर आणि साडी-चोळीचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ जुलै -**
माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष उमाकांत माने यांच्या वाढदिवसानिमित्त समाजाप्रती सामाजिक भान जपत एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

उमरगा शहरातील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने प्रतिष्ठानच्या वतीने रुग्णालयाला आरो वॉटर फिल्टर भेट देण्यात आले.

मान्यवरांच्या उपस्थितीत उमाकांत माने यांचा फेटा, शाल व हार घालून भव्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमावेळी डॉ. बिचकाटे, डॉ. संदीप बनसोडे, गिरीश सुरवसे, माधव पवार, अनिल बिराजदार, सिद्धेश्वर माने, राहुल सुरवसे, विठ्ठल चिकुंद्रे, डॉ. पेठसांगवीकर, विष्णू पांगे-पाटील, सुरेश मडोळे, भानुदास बोरुळे, उमाजी मंडले, अमर करके, रोहित सूर्यवंशी, शैलेश नागणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव जिल्हा कृती कार्यक्रम बैठक उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै -**
भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक ध्येय-धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आयोजित धाराशिव जिल्हा कृती कार्यक्रम बैठक नुकतीच उत्साही आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. या बैठकीत कार्यकर्त्यांमध्ये नवा ऊर्जा संचार झाला असून, पक्षसंघटना बळकट करण्यासाठी विविध योजनांची दिशा ठरवण्यात आली.

या बैठकीस आ. राणाजगजितसिंह पाटील, मा.आ. सुजितसिंह ठाकूर, मा.आ. बसवराज पाटील तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.



प्रमुख वक्त्यांनी आगामी काळात राबवण्यात येणाऱ्या अभियानांची सविस्तर माहिती दिली. १०० जनता दरबारांचे आयोजन, उद्योग व व्यवसायिक संधी निर्माण, बूथ सक्षमीकरण, युवक संलग्नता, सामाजिक संवाद, संपर्क से समर्थन, मतदार पोहोच अभियान यांसारख्या उपक्रमांवर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

पक्षसंघटना तालुका, मंडळ व बूथ स्तरावर अधिक प्रभावी करण्यासाठी सखोल चर्चा झाली. बैठकीस माजी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, नितीन काळे, सर्व मंडळाध्यक्ष, पदाधिकारी व जिल्ह्यातील विविध कार्यक्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते. विभागनिहाय अनुभव, अडचणी व आगामी कार्यपद्धतीवर सर्वांनी आपली मते मांडली.

## स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात पालक-शिक्षक सुविचार सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ जुलै -**
उमरगा येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात इयत्ता दुसरीसाठी पालक-शिक्षक सुविचार सभेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमात बालकाचा व्यक्तिमत्व विकास हा समाजातून घडतो, त्यामुळे शिक्षणाला आणि पालकांच्या सहभागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे असे मौलिक विचार डॉ. शुभांगिनी महाजन यांनी व्यक्त केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या.

तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शुभांगिनी महाजन उपस्थित होत्या. प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत विवेक जाधव गुरुजींनी पालक आणि शिक्षक यांची एकत्रित भूमिका कशी असावी, याचे सविस्तर विवेचन केले. याप्रसंगी पालक प्राध्यापक संग्राम कलाने, नेहा आंबुलगे, गोपाळ आष्टे गुरुजी, व्यंकट वचने गुरुजी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पालकांनी आपल्या सूचना व अडचणी मांडल्या असून त्याची प्राधान्याने दखल घेण्याची हमी प्रशासनाकडून देण्यात आली. एकूण १३० पैकी ९५ पालक उपस्थित राहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जैतून बी. मेंडके बाई यांनी तर आभार प्रदर्शन महेश कुलकर्णी गुरुजी यांनी केले.

## रस्ता अपघातात युवकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै -**
स्कुटीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने जागजी येथील युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. अपघातानंतर आरोपी वाहनचालक जखमीला मदत न करता घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत रामचंद्र अशोक पवार (वय ३५, रा. जागजी, ता. जि. धाराशिव) हे दि.२१ जुलै रोजी रात्री १०.३० वाजता स्कुटी (क्र. एमएच २५ बी.सी. ६४२९) वरून प्रवास करत होते.

यावेळी अज्ञात वाहनचालकाने आपले वाहन निष्काळजी व भरधाव वेगाने चालवून त्याच्या स्कुटीला जोरदार धडक दिली. या अपघातात रामचंद्र पवार गंभीर जखमी झाले व उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणाचा तपास ढोकी पोलीस करीत आहेत.

## एकलव्य विद्या संकुलात मुलींना मेहंदीचे प्रशिक्षण संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै -**
एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यमगरवाडी तालुका तुळजापूर येथे इयत्ता पाचवी ते दहावीच्या मुलींना मेहंदी प्रशिक्षणासाठी तुळजापूर येथील विद्याभारती शाळेतील चित्रकला शिक्षिका सुहानी सूर्यवंशी यांनी संकुलातील मुलींना मेहंदीचे प्रशिक्षण दिले.

मेहंदी मधील बारीक-सारीक गोष्टी खूप छान पद्धतीने समजून सांगितल्या. मेहंदीचे वेगवेगळ्या पद्धतीने रेखाटन यामधील बारकावे सांगितले. तसेच सूर्यवंशी यांच्या आई-वडिलांनी संकुलातील मुलींना नागपंचमीच्या सणानिमित्त मेहंदीचे कोण सदिच्छा भेट म्हणून दिले. हे प्रशिक्षण दोन दिवस चालणार आहे. नागपंचमीच्या दिवशी मेहंदीची स्पर्धा होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी अमृता काळे व आम्रपाली शिंदे यांनी केले. सुहानी सूर्यवंशी यांचा परिचय वर्षा वीर व सृष्टी कोळी हिने दिला. या कार्यक्रमाचे नियोजन प्रणिता व हुग्गे यांनी केले.

या कार्यक्रमाची संकल्पना एकलव्य प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल कुबेर म्हेत्रे व शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर यांची होती.

## श्री साई जनविकास आय.टी.आय. मध्ये कारगिल विजय दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै -**
व्ही.पी. शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील श्री साई जनविकास आय.टी.आय. मध्ये डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारगिल विजय दिन देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. सुरज ननवरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय निदेशक सुनील पुदाले यांनी करून दिला.प्राचार्य डॉ. सुरज ननवरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कारगिल विजय दिन हा केवळ एक ऐतिहासिक दिवस नसून भारतीय जवानांच्या शौर्य, पराक्रम आणि बलिदानाचा साक्षात्कार आहे.

१९९९ साली ऑपरेशन विजय अंतर्गत आपल्या वीर जवानांनी प्रतिकूल परिस्थितीत शत्रूंना पराभूत करून भारताच्या स्वाभिमानाची गाथा लिहिली. हा दिवस म्हणजे भारताच्या स्वराज्य आणि संस्कृतीचा उत्सव आहे.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, लेखापाल योगेश मंडलिक, डी.एम. घावटे, निदेशक सुनील पुदाले, सागर सुतार, सुमंत भोरे, अभिजीत वीर, तसेच संस्थेतील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.एम. घावटे यांनी केले. संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारलेले होते व विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची नवी ऊर्जा संचारली.

## कलावंतांची फरफट : ज्येष्ठ साहित्यिक व वृद्ध कलावंत 'मिटींग'च्या प्रतिक्षेत



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२७ जुलै -**
राज्य शासनाच्या राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व विविध कार्यक्षेत्रातील कलावंत सन्मान योजनेंतर्गत गेल्या एक वर्षापासून मिटींग न घेण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



पूर्वीच्या शासन आदेशानुसार अ, ब, क श्रेणीनुसार मानधन देण्यात येत होते. मात्र तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने सुधारणा करत सरसकट ५ हजार रूपये मासिक मानधन मंजूर केले. तथापि, सध्याच्या महागाईच्या पार्श्वभूमीवर हे मानधन अपुरे वाटत असून, मानधनात वाढ करण्याची मागणी कलावंतांकडून वारंवार केली जात आहे.

जिल्ह्यातील पात्र वृद्ध कलावंतांनी आपले प्रस्ताव तालुका स्तरावर पंचायत समितीकडे दाखल केले आहेत. मात्र गेल्या दीड वर्षांपासून कोणतीही मिटींग आयोजित न झाल्यामुळे, हा विषय पूर्णपणे दुर्लक्षित झाल्याचे चित्र आहे. समाजकल्याण विभागाने लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिते पूर्वी मुलाखतीसाठी पात्र कलावंतांना पत्रे पाठवली होती. मात्र आचारसंहिता लागल्यानंतर ती मिटींग रद्द करण्यात आली. त्यानंतर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही, ही बाब कलावंतांचा हिरमोड करणारी ठरली आहे. नवीन शासन आदेशानुसार समाजकल्याण विभागाने जिल्हा परिषद व पंचायत समितीकडे रेकॉर्ड सुपूर्त केला आहे. तरीही एक वर्ष उलटल्यानंतरही पात्र लाभार्थ्यांची मिटींग होत नसल्यामुळे संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयाकडे लक्ष देत तात्काळ मिटींग घेण्याचे आदेश जिल्हा प्रशासनास द्यावेत, अशी मागणी ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांकडून करण्यात येत आहे.

मिटींग कधी होणार?, हा प्रश्न आज प्रत्येक कलावंताच्या ओठांवर आहे. शासनाने या योजनेबाबत गंभीरतेने विचार करून सन्माननीय ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांना न्याय द्यावा, अशी भावनिक मागणी कलावंत वर्तुळातून होत आहे.

# आ.खोतकर यांच्या इशाऱ्यानंतर ढिसाळ महावितरण आले ताळ्यावर!



## भर पावसातही विजपुरवठा सुरळीत सुरू; बिघाडीचे प्रमाण घटले

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थितीत २२ जुलै रोजी झालेल्या बैठकीत आमदार अर्जुन खोतकर यांनी वीज कंपनीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले होते. खंडित विजेचा प्रश्न सुटला नाही, तर सळो की पळो करून सोडण्याचाही इशारा दिला होता. आ. खोतकरांच्या दणक्यानंतर वीज कंपनीचा कारभार कमालीचा सुधारला असून, गत दोन दिवसांपासून सतत पाऊस पडत असला, तरी वीजपुरवठा सुरळीत सुरू आहे. थोडेही वारे सुटले किंवा पाऊस सुरू झाला की वीज गूल होण्याचा प्रकार वाढला होता. अनेकवेळा तासंतास वीज गायब राहत असल्याने व्यापारी, उद्योजक, व्यावसायिकांना एक ना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. खंडित वीजपुरवठ्याबाबत शहरातील नागरिकांनी आमदार खोतकर यांच्याकडे वेळोवेळी तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत आ. खोतकर यांच्या आग्रहाखातर २२ जुलै रोजी ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या उपस्थितीत जालना येथे वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत आ. खोतकर यांनी वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. विजेचा प्रश्न सोडवा अन्यथा आम्ही वेगळ्या पद्धतीने तुम्हाला सळो की पळो करुन सोडू, असा इशारा त्यांनी दिला होता, दरमयान या इशाऱ्यानंतर जालन्याचे महावितरण चांगलेच ताळ्यावर आले असुन सध्यातरी शहरात व्यवस्थीत वीज पुरवठा होतांना दिसत आहे.

# संक्षिप्त

## परतूर येथे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेशभैय्या नळगे यांच्या नेतृत्वाखाली माजी मुख्यमंत्री तथा पक्षप्रमुख श्री उद्धवजी ठाकरे साहेब यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने परतूर तालुक्यात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

परतूर शहरात शिवसेनेच्या वतीने ग्रामीण रुग्णालयात तसेच स्नेंहकुर अनाथ प्रकल्प आणि राधामाधव मुलींची वारकरी शिक्षण संस्था व सरकारी दवाखाना येथे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, अशोकराव आघाव, तालुकाप्रमुख भारतराव पंडित, विठ्ठलराव वटाणे, दीपक काळे, राहुल कदम, आबासाहेब कदम, शहरप्रमुख दत्ता सुरुंग, राहुल कदम, संदीप पाचारे, इब्राहिम कायमखानी, लक्ष्मीकांत कवडी, प्रभाकर खंदारे, वसंत बरकुले, दादाराव बरकुले, शाहीर खालापूरे, राजू शिंदे, देविदास राठोड, प्रमोद खंदारे, माऊली राजबिंडे, विजय वाणी, गोपाळ माने, विठ्ठल लीपणे, भागवत चव्हाण, बळीराम सोळंके, गौरव कदम, किशोर सोळंके, विठ्ठल माने, अनिल सोळंके, अनिस पठाण सह शिवसेनेच्या पदाधिकारी वारकरी मुलींना फळ वाटप करून साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधिज्ञांच्या साहित्य संमेलनात चमकले जाफराबादचे शरद पाटील वाकडे



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथे कांचनवाडी येथील राष्ट्रीय विधी विद्यापीठ पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजतर्फे दिनांक २६ जुलै २०२५ रोजी देशातील पहिल्या विधीज्ञ साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते या साहित्य संमेलनामध्ये जाफराबाद येथील विधीज्ञ शरद पाटील वाकडे यांनी विसरू नका मराठीला या कवितेच्या सादरीकरणाने उपस्थित सर्वांचे लक्ष वेधले व कार्यक्रमाचे अध्यक्ष सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश प्रसन्न वराळे साहेब यांनी सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन गौरव केला.

या गौरवाबद्दल अँड.शरद वाकडे यांचे वकील संघ जाफराबाद, तालुक्यातील नागरिकांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

या साहित्य संमेलनात मराठी भाषा समृद्ध व्हावी मराठीचा अभिमान बाळगला पाहिजे शिवाय जतन आणि संवर्धनासाठी मनापासून स्थायी स्वरूपाचे प्रयत्न करावे लागतील असा सूर, विधिज्ञांच्या साहित्य संमेलनातून निघाला. या कार्यक्रमास कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश माननीय श्री.प्रसन्न वराळे साहेब,माजी न्यायाधीश अभय ओक साहेब,उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मनीष चितळे,विधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.बिंदू रोनाल्ड,स्वागताध्यक्ष अँड.अनिल गोळेगावकर,समन्यवक अँड.संजीव देशपांडे सहसमन्वयक अँड.संभाजी टोपे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी या साहित्य संमेलनात अनेक मान्यवरांनी व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या साहत्यिक कवी असणाऱ्या विधीज्ञ मंडळीने सहभाग घेतला होता.

## महिला सुरक्षा व न्यायासाठी महिला काँग्रेसचा जालना शहरात मूक मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

देशभरात महिलांवर वाढणारे अत्याचार, न्याय मिळण्यात येणारा विलंब आणि केंद्र सरकारची निष्क्रिय भूमिका याच्या निषेधार्थ जालना जिल्हा महिला काँग्रेसतर्फे गांधी चमनवर शनिवारी मूक मोर्चा काढण्यात आला.

महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, केंद्र सरकार या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करत आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनातही महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर सरकार मौन बाळगत आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अल्का लांबा यांच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे यांच्या आदेशानुसार राज्यभर विविध ठिकाणी महिला काँग्रेसतर्फे आंदोलने करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जालना शहरात गांधी चमनवर हा मूक मोर्चा काढण्यात आला. या मूक मोर्चाद्वारे महिलांनी आमच्यावर होणाऱ्या अन्यायाचा आवाज ऐका असा संदेश सरकारला दिला. कोणताही गोंधळ किंवा घोषणाबाजी न करता शांततेत व्यक्त केलेला निषेध हे आंदोलनाचे वैशिष्ट्य ठरले. या मूक आंदोलनात जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार यांच्यासह लतीफा शेख, सविता गायकवाड, जया आठवले, सावित्रीबाई इंगळे, मनीषा चांदोडे, प्रतिक्षा खाडे, कोमल कामतीकर आणि इतर महिला काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महिलांवर अत्याचार रोखण्याची जबाबदारी सरकारची आहे. मात्र सत्ताधारी मंडळी केवळ निवडणुकीपुरते महिला हिताचे घोषणाबाजीत अडकून राहतात. आमचा लढा केवळ राजकारणासाठी नव्हे, तर प्रत्येक अत्याचारग्रस्त महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी आहे, असे जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार यांनी स्पष्ट केले.

# त्रज्ञानाच्या मदतीने अध्ययन– अध्यापन प्रक्रिया अधिक सुकर –डॉ.विद्या पटवारी

» दानकुंवर महिला महाविद्यालयात 'अध्ययन व्यवस्थापन प्रणाली' कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञेच्या युगात जीवनाच्या अनेक क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले आहेत. बदल आणि समायोजन यांचा जवळचा संबंध असणाऱ्या शिक्षण – प्रशिक्षण क्षेत्रात देखील यामुळे अनेक सकारात्मक बदल झालेले दिसून येतात. नव्या बदलांचा स्वीकार करून ते आत्मसात करून स्वतःला अद्ययावत करण्याचा प्रयत्न या क्षेत्रातील प्रत्येक घटकाने केला पाहिजे. शिक्षणाची पारंपरिक चौकट भेदून नव्या संकल्पना स्वीकारण्याची गरज आज निर्माण झाली असल्याचे मत श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ.विद्या पटवारी यांनी व्यक्त केले. महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने ' अध्ययन व्यवस्थापन प्रणाली ' या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या



उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक विनोद अग्रवाल यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.जितेंद्र अहिरराव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. वासुदेव उगले,उपप्राचार्य प्रा.पूजा अरोरा, कार्यशाळा समन्वयक प्रा. पार्वती देशमुख यांची विशेष उपस्थिती तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.कुणाल टकले, प्रा.राहुल अंभुरे यांची उपस्थिती होती.

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात होऊ घातलेल्या नवीन बदलांबाबत अवगत करण्यासाठी अशा कार्यशाळा महत्त्वाची भूमिका बजावतात. आजच्या युगातील विद्यार्थी तंत्रस्नेही आहे, अशा विद्यार्थ्यांना शिकविणारे शिक्षक देखील तंत्रस्नेही असायला हवेत. शिक्षकांनी सातत्याने आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे असल्याचे मत संस्थेचे संचालक विनोद अग्रवाल यांनी आपल्या अध्यक्षयीय भाषणातून व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.जितेंद्र अहिरराव यांनी शिक्षण क्षेत्रात जागतिक स्तरावर घडणाऱ्या घडामोडी आणि भारतीय विद्यार्थ्यांची भूमिका या विषयावर विवेचन केले.

कार्यशाळा आयोजनामागची भूमिका डॉ.वासुदेव उगले यांनी आपल्या प्रास्ताविकातून विषद केली. कार्यशाळेच्या समन्वयक प्रा.पार्वती देशमुख यांनी विद्यार्थी, शिक्षकाच्या दृष्टीने कार्यशाळेची उपयोगिता स्पष्ट केली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात प्रा. कुणाल टकले यांनी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून अध्ययन, अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी कशी करता येईल या बाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली. गुगल क्लासरूमचा वापर अध्यापनात परिणामकारक पद्धतीने कसा केला जाऊ जातो याचे सादरीकरण केले. प्रा.राहुल अंभोरे यांनी आपल्या सविस्तर विवेचनातून नोटबुककेएलएमचा प्रभावी पद्धतीने वापर करण्याबाबत माहिती दिली. महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न दिल्यास शिवसेना स्टाईल आंदोलन – प्रदीप बोराडे



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यात २१ जुलै ते २३ जुलै दरम्यान झालेल्या अतिवृष्टीने हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांच्या शेतीचे तात्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत करावी अन्यथा तहसील कार्यालयावर बैलगाडीसह मोर्चा काढून शिवसेना स्टाईल आंदोलन करणार असा इशारा शिवसेना तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी दिला आहे.

यासंदर्भात तहसीलदार मंठा यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मंठा तालुक्यातील बहुतांश गावात ज्यामध्ये जयपूर, बेलोरा, बेलोरा तांडा, एरंडेश्वर, कोकरसा, दहा, शिवनगिरी , माळेगावसह अनेक गावात मोठ्या प्रमाणात ढगफुटीसदृश्य पाऊस होवून शेतकऱ्यांच्या शेतातील पिके मातीसह वाहून गेली. काही ठिकाणाच्या जमीनी देखील खरडून गेल्या आहेत. यामध्ये सोयाबीन, कापूस, तुर, उडिद, मुग या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळवून देण्यात यावी नसता शिवसेना स्टाईलने बैलगाडीसह तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल याची नोंद घ्यावी. असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, अनंता वैद्य, उपतालुकाप्रमुख देविदास खरात, आसाराम बोराडे, बाळासाहेब वैद्य, सचिन चव्हाण, करण बोराडे, निलेश बोराडे, विठ्ठल देशमुख, राम देशमुख, लक्ष्मण देशमुख, अर्जुन मस्के, अभिमान मस्के, गणेश बनसोडे, रमेश बनसोडे, रामेश्वर देशमुख, मधुकर राठोड,विनोद पवार, रामप्रसाद पवार, गजानन देशमुख, हनुमंत देशमुख, बाजीराव देशमुख, मारोती देशमुख, उद्धव देशमुख, गजानन काकडे, विजय बनसोडे, गोविंद पवार, परसराम देशमुख यांची उपस्थिती होती.

# परतूरच्या आठवडी बाजारात भाजीविक्रेत्यांसह ग्राहकांचे हाल!



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

येथील आठवडे बाजारात नगरपालिकेची कुठलीही सुविधा नसल्याने भाजीपाला विक्रेते तसेच ग्राहकांना अतोनात त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यातच मागील दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे शनिवारच्या आठवडे बाजारात चिखलच चिखल झाल्याने त्रासात आणखी भर पडली. या शहराला कोणी वाली आहे की नाही असा प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहे.

शहरात गाव भागात मध्यवर्ती बसस्थानकाजवळ दर शनिवारी आठवडे बाजार भरतो. परंतु बाजाराच्या ठिकाणी नगरपालिकेच्या वतीने कुठलीही सुविधा देण्यात आलेली नाही. भाजीपाला विक्रेत्यांना बसण्यासाठी पुरेसे ओटे नाहीत. पिण्याच्या पाण्याची सोय नाही. इतरही कुठल्या सुविधा नाहीत.वसुली मात्र नियमित केली जाते. त्यातच मागील दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे बाजारात चिखलच चिखल झाला आहे. भाजीविक्रेत्यांना अक्षरशः चिखलतच आपली दुकाने लावावी लागली.बाजारात मोकाट जनावरांचा सुळसुळाट झाला आहे. बाजारात आवश्यक त्या सुविधा देण्यात याव्यात या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येते. बाजाराची अवस्था पाहून या शहरात नगरपालिकेचे कार्यालय आहे की नाही असा प्रश्न पडतो. तसेच शहराला तसेच तालुक्याला लाभलेल्या लोकप्रतिनिधिंचे देखील शहरातील नागरी समस्याकडे कमालीचे दुर्लक्ष असल्याने तक्रार करावी तरी कोणाकडे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

> “ शहरातील आठवडे बाजारात कुठल्याही सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.
>
> शहरात देखील नागरी समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. वाढलेल्या समस्याकडे कोणाचेही लक्ष नाही. नगरपालिकेचे कमालीचे दुर्लक्ष आहे. पालिकेच्या निवडणुका झाल्या नसल्याने नगरसेवक तसेच नगराध्यक्ष नाहीत.एकंदरीत नागरी समस्याकडे सर्वांचेच दुर्लक्ष आहे. **– अर्जुन पाडेवार, परतूर.**

# शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त फळवाटप

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आज (ता. २७) रविवारी अंबड तालुका शिवसेनेच्यावतीने अंबड उपजिल्हारुग्णालय येथे रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी शिवसेनेचे जालना उपजिल्हाप्रमुख हनुमान धांडे, शिवसेना अंबड तालुका प्रमुख दिनेश काकडे, बाळासाहेब गावडे, मा शहरप्रमुख कुमार रूपवते, युवा सेनेचे उपजिल्हाधिकारी राम लांडे, शहरप्रमुख नंदकुमार पुंड, उप-तालुकाप्रमुख प्रभु बामणे, उपशहरप्रमुख रवि इंगळे, किशोर खरात, गजानन सानप सुरेश राणा, संदीप सदावर्ते, बाळु सपकाळ, गोरखनाथ



डोके, राजु डोके, बद्रीनाथ मोटकर, बळीराम भडक आदींसह शिवसेनेचे इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात विविध समाजापयोगी तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून अंबड तालुका शिवसेनेच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईसह राज्यभरातील कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. त्यातच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जावून उद्धवजी ठाकरे यांची भेट घेत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्याने दोन्हीही पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण पसरले आहे

# भाजपा जालना महानगर जिल्ह्यात मन की बात कार्यक्रम संपन्न

## पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे मार्गदर्शन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी –जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारताचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी आज (ता.२७) सकाळी ११ वाजता मन की बात या मासिक रेडिओ कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा मुख्य कार्यक्रम भाजप जिल्हा कार्यालय, जालना येथे संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे हे स्वतः उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे मार्गदर्शन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी असून, 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे देशहिताचे विचार, सामाजिक जाणीवा आणि नव-



चेतना निर्माण होते. असे त्यांनी सांगितले. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेशजी राऊत, मा.जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, सतीश जाधव, विमलताई आगलावे, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, अर्जुन गेही, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, सिद्धिविनायक मुळे, देविदास देशमुख, राजेश जोशी, गोवर्धन कोल्हे, प्रशांत गाडे, सोमेश काबली, सेवकराम नारियलवाले, बाबुराव भवर, सुदर्शन काळे, गोविंद ढेंबरे, दत्ता जाधव आदीसह प्रमुख उपस्थिती होती. तसेच सदरील कार्यक्रम भाजपा जालना महानगरातील विविध मंडळात आयोजित करण्यात आला त्यामध्ये नवीन जालना मंडळात मंडळ अध्यक्ष सुनील खरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जुना जालना मंडळात मंडळ अध्यक्ष महेश निकम, पूर्व जालना मंडळात अमोल धानुरे व जालना ग्रामीण मंडळात तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाला महिला मोर्चा, युवा मोर्चा, व्यापारी आघाडी, अनुसूचित जाती-जमाती मोर्चा, अल्पसंख्याक मोर्चा, इत्यादी आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मन की बात कार्यक्रम ऐकला.

# भाविकांच्या मनोकामना पूर्ण करणारा महादेव म्हणजे तीर्थक्षेत्र गंगणबीड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ जुलै -**

नांदेड-हैदराबाद महामार्गावर गंगणबीड फाट्या जवळ उंच डोंगरावर शेकडो वर्षापूर्वी वसलेले शिव-पार्वतीचे एकत्रित हेमाडपंथी मंदिर आहे.गंगणबीड मंदिर हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे डोंगरावरील सपाट भागावर वसलेल्या मंदिराला लाखो भाविक भेट देतात या मंदिराची एक आख्यायिका असून इच्छा पूर्ण करणारा इच्छा पूर्ण करणारा शंभो महादेव असल्याची भाविकांची श्रद्धा आहे.काहीच्या मते हरि-हराचे एकत्रित असलेले ठिकाण उंच शिखरावरचे गगनातील तीर्थक्षेत्र गंगणबीड शासकीय दप्तरी(तलबीड) अशी नोंद असलेले गाव होय.येथील प्रसिद्ध महादेव मंदिर देवस्थान हे प्रति शिखर शिंगणापूर म्हणुन ओळखले जाते.येथे श्रावण सोमवारच्या निमित्ताने भाविकांची आलोट गर्दी जमा होते.गर्दीची संख्या लक्षात घेऊन चोख पोलिस बंदोबस्त लावून भाविकांचे दर्शन सुरळीत पार पाडण्यासाठी समिती नेहमी प्रयत्नशील असते.नरसी-नायगाव पासून अवघे ७ कि.मी. अंतरावार तर नांदेडपासून केवळ ४० कि.मी. अंतरावर गंगणबीड फाटा आहे.त्याठिकाणी गंगणबीड हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. डोंगरावरील सपाट भागावर असलेल्या या मंदिराची तीन शिवेवर विराजमान असल्याची ख्याती आहे. गंगणबीड, राणसुगाव, निळेगव्हाण,घुंगराळा हे महादेव मंदिर सर्वांचे श्रद्धेचे स्थान असल्याने येथे श्रावण सोमवारी व महाशिवरात्रीला लाखो भाविक भेट देतात.



**शंभू महादेवाची मूर्ती 'स्वयंभू'**

येथील चिंतामणी हा सर्वांच्या मनोकामना पूर्ण करतो .अशी या मंदिराची आख्यायिका असून, ईच्छा पूर्ण करणारा शंभू महादेव असल्याची भाविकांची श्रद्धा आहे.माळरानावर वसलेले हे मंदिर निसर्गरम्य वातावरणात आहे.या तीर्थक्षेत्राला भेट देण्यासाठी आंध्र प्रदेश,कर्नाटक, तेलंगणा, विदर्भ, सह मराठवाड्यातील व इतर राज्यातूनही भाविक मोठ्या संख्येने येतात... गंगणबीड येथील शंभू महादेवाची मूर्ती ही स्वयंभू आहे. येथील शिवलिंग मूर्तीवर शिव व पार्वती एकत्र विराजमान असल्याचे भाविक सांगतात तर काहींच्या मते हरि-हरा भेद नाही असे सांगून येथील शिवलिंगाला विशेष महत्त्व देऊन दर्शन घेण्यासाठी प्रयत्न करतात.

# श्रावण महिन्याचा किनवट तालुक्यात भक्तिमय सुरूवात शिवालयात भाविकाची गर्दी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२७ जुलै -**

हिंदू पंचांगानुसार आषाढ अमावस्येनंतर सुरू होणारा श्रावण महिना हा भक्तिभावाने ओतप्रोत भरलेला, धार्मिक दृष्टिकोनातून पवित्र मानला जाणारा काळ आहे. यंदा शुक्रवार, दिनांक २५ जुलैपासून श्रावण महिन्याला सुरुवात झाली असून, संपूर्ण महिनाभर भगवान शंकराच्या उपासनेसाठी भक्तगण मोठ्या संख्येने शिवमंदिरात गर्दी करत आहेत. किनवट तालुक्यातील विविध शिवालये आणि नैसर्गिक रमणीय स्थळे या श्रावणात शिवभक्तांसाठी आस्था व आध्यात्मिकतेचा केंद्रबिंदू ठरत आहेत.

श्रावण महिन्यात नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, पोळा अशा सणांच्या निमित्ताने शिवमंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असते. यामध्ये नागढव येथील पुरातन शिवमंदिर, मदनापूर येथील ऐतिहासिक महादेव मंदिर, पैनगंगा नदीकाठी वसलेले शिवमंदिर व नर्मदेश्वर मंदिर (किनवट शहर) हे विशेष उल्लेखनीय आहेत.



अंबाडी येथील हेमाडपंथी शैलीतील बालाजी मंदिरात असलेले शिवमंदिर हे वास्तुशैली व धार्मिक महत्त्व यामुळे भाविकांचे आकर्षण ठरते. तर मौजे राजगड येथील निसर्गरम्य वातावरणात, धबधब्याच्या सान्निध्यात असलेले महादेव मंदिर हे पर्यटकांसाठीही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

श्रावण महिन्याच्या निमित्ताने महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला सहस्त्रकुंड धबधबा आणि तेथील प्राचीन शिवमंदिर भाविकांना मंत्रमुग्ध करणारे आहे. धबधब्याच्या गडगडाटी जलप्रपातासह शिवमंदिराचे वातावरण भक्तांना अध्यात्मिक अनुभूती देणारे ठरते. तसेच, गरम पाण्याच्या स्त्रोतांनी समृद्ध असलेले उनकेश्वर येथील शिवमंदिर हे केवळ धार्मिकच नव्हे, तर नैसर्गिक आणि वैद्यकीय दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे. या ठिकाणी असलेले महात्म्य, पुराणकथांमध्ये दिलेले उल्लेख, आणि औषधी गरम पाण्याचे कुंड भाविकांना व पर्यटकांना आकर्षून घेतात.

या वर्षी श्रावणात चार सोमवार असून, प्रत्येक सोमवार 'श्रावणी सोमवार' म्हणून साजरा केला जात आहे. या दिवशी शिवमंदिरांमध्ये 'शिवमूठ' अर्पण करण्याची परंपरा आहे. यात सोमवारनुसार वेगवेगळे धान्य अर्पण केले जाते त्यात २८ जुलै रोजी तांदूळ, ४ ऑगस्ट तीळ, ११ ऑगस्ट मूग तर १८ ऑगस्ट रोजी जवस अर्पण करण्यात येणार आहेत.

हे धान्य अर्पण करताना ओम नमः शिवाय चा गजर आणि विविध अभिषेक विधीमुळे मंदिर परिसर भक्तिमय आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा ठरतो.

श्रावण मास हा केवळ धार्मिक नव्हे, तर निसर्गाच्या सौंदर्याची आणि आभार मानण्याची जाणीव करून देणारा काळ आहे. सप्ताहातील प्रत्येक दिवस वेगवेगळ्या व्रतांनी सजलेला असतो. सण, व्रत, उपवास, आणि सामूहिक पूजाविधी यामुळे सामाजिक संवाद व एकोपा वाढतो. या पार्श्वभूमीवर, किनवट तालुक्यातील वरील सर्व शिवमंदिरांमध्ये श्रावण महिन्याभर 'ॐ नमः शिवाय' चा अखंड जप, रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक, बेलपत्र अर्पण, हरहर महादेवचा घोष, भक्ती गीतांचे गायन आणि सामुदायिक आरती यांचे आयोजन केले जात आहे. श्रावण महिना हे आध्यात्मिक उन्नतीचे, निसर्गप्रेमाचे आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असून, किनवट तालुक्यात तो मोठ्या भक्तिभावाने आणि धार्मिक उत्साहात साजरा होत आहे.

# कृषी पर्यटन केंद्रातील खोल्यांत तीन जोडपे ; केंद्र चालकाविरुद्ध सोनखेड पोलिसांत गुन्हा

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२७ जुलै**

तालुक्यातील वाडेपुरी शिवारातील पर्ण कृषी पर्यटन केंद्र येथे कॉलेज मध्ये शिक्षण घेत असलेले तीन तरुण व तीन तरुणींना सोनखेड पोलिसांनी धाड टाकून तरुण तरुणींना ताब्यात घेऊन तेथील लॉज मालकाविरुद्ध पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला.

सोनखेड पोलिस ठाणे अंतर्गत असलेल्या वाडेपुरी येथे पर्ण कृषी पर्यटन केंद्र सुरू असून तेथे पर्यटनातून व्यवसाय निर्माण व्हावा अशी शुद्ध संकल्पना होती. मात्र कालांतराने सदरील हेतूला हरताळ फसल्याचे सदर घटनेवरून समोर आले. जिल्हा पोलिस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या आदेशान्वये जिल्ह्यात हॉटेल, लॉज तपासून गैरकृत्य आढळून आल्यास कार्यवाही करण्याचे आदेश पोलिसांना मिळाल्यावरून सोनखेड पोलिसांनी गस्तीदरम्यान वाडेपुरी शिवारातील विठ्ठल शिवाजी दळवे यांच्या मालकीच्या पर्ण कृषी पर्यटन केंद्र येथे सोनखेडचे सपोनि. पांडुरंग माने यांच्या नेतृत्वाखालील पोलिस पथकाने पाहणी केले असता येथील विविध खोल्यांमध्ये कॉलेज मध्ये शिक्षण घेत असलेले तीन तरुण आणि तीन तरुणी आढळून आले. पर्यटन केंद्र चालकास बोलावून तेथील भेटीची नोंद वही तपासण्यात आली तेंव्हा मागील तीन दिवसांपासून एकाही पर्यटकाची नोंद केलेली आढळून आली नाही. सदर घटनेप्रकरणी विठ्ठल दळवे यांच्या विरुद्ध सोनखेड पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सदरील कार्यवाहीत सोनखेडचे पोलिस अधिकारी पोलिस अधिकारी माने यांच्यासह पो.उप.नि. वैशाली कांबळे, पो.उप.नि. अनिश सयद, पोहेकॉ विश्वनाथ हंबर्डे, पोहेकॉ नामदेव रेजीतवाड आदींचा सहभाग होता.

## संक्षिप्त वृत्त



### मुदखेड शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कारगिल विजय दिवस साजरा

**मुदखेड** -मुदखेड शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (बंदा सिंघजी बहादूर) येथे दि. २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या प्रथमता कारगिल युद्धात वीरमरण पत्करलेल्या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच कारगिल विजय दिनाचे औचित्य साधत उपस्थित माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे प्राचार्य एस. एस. परघणे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक तथा सैनिक फेडरेशन मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मण देवदे,तसेच माजी सैनिक सुनील चौदंते,प्रभू घोंगडे,राजाराम हाळदे,देवराव चौदंते,देवीदास पवार,साहेबराव वन्ने,मारुती गुंठे,चंद्रकांत तेलंगे,संजय चव्हाण,फकीरा धाबे,मुख्य वक्ता हेमंत इंगळे तसेच आय.एम. सी. सदस्य राम आबादार, शिवानंद खतगाये, देविदास बोंडले , अभियंता जयंत राजवाडीकर दीपक भक्ते, तेजराव कस्तुरे, कु.मेघा निखाते, यांच्यासह विद्यार्थी/ प्रशिक्षाणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भांडारपाल ज्ञानोबा खराटे व निदेशक कु.आरती गायकवाड यांनी केले. आभार प्रदर्शन गटनिदेशक सुनिल नन्नावरे यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिल्प निदेशक, अनिल बोइनर , स्वाती कदम, राजरत्न सरपाते, प्रतिक हनुमंते,पंकज पवार,वरीष्ठ लिपीक नितेश लोट, हर्षवर्धन चौदंते, निलाबाई यासह आदींनी विशेष परीश्रम घेतले होते.

# पोलीसांना जाब विचारणाऱ्या तक्रारदारालाच दमदाटी

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.२६ जुलै -**

अॅट्रॉसिटी प्रकरणातील आरोपीला अटक करण्याचे सोडून त्यास मदत करत असल्याचे निदर्शनास आल्यावर याचा जाब विचारणाऱ्या तक्रारदारालाच 'तुला पोलिसी हवा दाखवू का?' अशी धमकी देणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी तक्रारदाराने विशेष पोलिस उपमहानिरीक्षक व एसपी यांच्याकडे २१ रोजी निवेदनाद्वारे केली.

१७ मे रोजी विमानतळ पोलिस ठाण्यात मुख्य आरोपी डॉ. राजेंद्र पुंजाराव कदम याच्यासह ३९ जणांवर अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर आरोपीला अटक होत नसल्याने तक्रारदार केशव गोविंद थोरात यांनी ठाण्यासह विमानतळ पोलिस उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयात चकरा मारल्या. दरम्यान, १५ जुलै रोजी तक्रारदार केशव थोरात उपविभागीय पोलिस अधीक्षक कार्यालय नांदेड शहर येथे गेले असता आरोपी डॉ. राजेंद्र कदम तेथेच होता. यावेळी तेथील पोलिस कर्मचारी आरोपीस काही मजकूर वाचवून दाखवत असतानाच 'तुम्ही आरोपीला अटक का करत नाही', असे विचारले असता कर्मचाऱ्यांनी 'तुला काय करायचे ते कर', असे थोरात यांना धमकावले. त्यानंतर पोलिस अधिकाऱ्यांनी 'तुझी तक्रार घेत नाही आणि आरोपीलाही अटक करत नाही, नाटक करशील तर पोलिसी हवा दाखविल' अशी धमकी दिली, असे निवेदनात नमुद केले.

# सिडको ते शिर्डी साईबाबा पालखी पदयात्रेचे प्रस्थान



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२७ जुलै**

सिडको ते शिर्डी साईबाबा पदयात्रा पालखीचे आयोजन करून श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिडकोतील साईभक्त तथा पदयात्रेचे अध्यक्ष गणेश जयस्वाल यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता साईबाबा नगर सिडको येथून शिर्डी कडे ही पदयात्रा प्रस्थान झाली

सिडको येथील साईभक्त गणेश जयस्वाल हे गेल्या १४ वर्षापासून सतत सिडको नांदेड ते शिर्डी साईबाबा देवस्थान येथे श्रावण मासानिमित्त साईबाबा पालखी पदयात्रा सोहळा काढून सिडको परिसरातील भाविक भक्तांना आपल्या नेतृत्वाखाली शिर्डी येथे घेऊन जात असतात त्याचप्रमाणे दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता साईबाबा नगर बिड कॉलनी सिडको

येथून पदयात्रा पालखी निघाली आहे. या पालखीत सिडको हडको परिसरातील शेकडो भाविक भक्त सहभागी झाले होते. सदर पालखी यात्राही दररोज ३० ते ३५ किलोमीटर चालून मुक्काम करणार असुन पूर्ण अंतर एकूण ४१७ किमी अंतर चालून ती १५ दिवसात साईबाबा शिर्डी येथे पोहोचतील.सदरील पालखी पदयात्रा प्रस्थान करीत असताना सिडकोत ठीक ठिकाणी

भाविकांनी पालखीची पूजा अर्चा करून दर्शन घेतले. सदरील साईबाबा पालखी पदयात्रा यशस्वी करण्यासाठी पदयात्रेचे अध्यक्ष गणेश जयस्वाल, उपाध्यक्ष नागोराव वाघमोडे व मारोती वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी परिश्रम घेऊन भाविकांची काळजी घेत आहेत.

# डायल ११२ वर खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल; तरुणास अटक

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२६ जुलै -**

डायल ११२ सारख्या आपात्कालीन सेवेचा गैरवापर करून वारंवार कॉल करुन खोडसाळपणे खोटी माहिती देऊन पोलिसांना विनाकारण त्रास देणाऱ्या माहूर तालुक्यातील मेट येथील एका तरुणास पोलिसांनी २६ जुलै रोजी ताब्यात घेत गुन्हा दाखल करत कडक कारवाई केली आहे.

डायल ११२ या आपात्कालीन हेल्पलाइन नंबरवरुन वारंवार कॉल करुन खोडसाळपणे खोटी माहिती देत पोलिसांना विनाकारण त्रास देणाऱ्या माहूर तालुक्यातील मौजे मेट येथील एका तरुणाविरुद्ध पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल करून त्यास ताब्यात घेण्यात आल्याची घटना शनिवारी घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

दि.२६ जुलै रोजी सायंकाळी ०७:०७ वाजण्याच्या सुमारास मौजे मेट येथील एक



३५ वर्षीय इसम व्यवसाय चालक याने डायल ११२ वर माहूर पोलिसांना वारंवार, सतत पणे कॉल करून खोडसाळ पणे खोटी माहिती दिली कि, मौजे मेट येथे अवैध दारू विक्री चालू आहे!असे सांगितले. यावरून लगेच पोलीसांनी सदरील ठिकाणी जाऊन तपास केला असता कुठेही अवैध दारू विक्री होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले नाही. पोलिसांना खोटी माहिती देऊन दिशाभूल केल्याचे लक्षात येताच पोलिसांनी माहिती देणाऱ्याच्या फोनचे लोकेशन ट्रेस करत सदर ठिकाणी पोलीस गेले असता कॉलर हा कॉल उचलत नव्हता. नंतर त्याने मोबाईल बंद केला. त्यानंतर त्याचे घरी जाऊन दारू विक्री कुठे चालू आहे? असे पोलिसांनी विचारपूस केली असता कॉलरने खोडसाळ पणे खोटी माहिती ११२ वर कॉल करून दिल्याचे सांगितले.यावरुन पोलिसांनी सदरील खोटारड्या तरुणास ताब्यात घेतले.

या प्रकरणी सदर इसमावर डायल ११२ वर वारंवार, सतत पणे कॉल करून खोडसाळ पणे सार्वजनिक सेवक,लोकसेवकास त्रास होईल या उद्देशाने खोटी माहिती दिल्याने त्याचे विरुद्ध कलम २१२ बि एन एस प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदरील कारवाई पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि संदीप अन्येबोईनवाड,पोहेका चालक जाधव,पवन राऊत,ज्ञानेश्वर खंदाडे यांचेसह होमगार्ड यांनी पार पाडली.

# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि.२७ जुलै -**

येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या सभागृहात सैनिकी विज्ञान विभागाच्या वतीने २६ वा कारगिल विजय दिवस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एम. बिडवे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मळगे प्राथमिक शाळेचे शिक्षक प्रदीप काळे उपस्थित होते.

# भोकर शहरात रेतीची अवैध वाहतूक;महसूल विभागाचे दूर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.२६ जुलै -**

शहरात मोठ्या प्रमाणात रेतीची अवैध वाहतूक होत असताना महसूल विभागाने याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करित आहे.


भोकर शहरात मागील काही दिवसापासून रेती मूरुम अवैधरित्या उत्खनन सूरु आहे याकडे भोकर महसूल विभाग साफ दूर्लक्ष करित आहे महसूल विभागाचे पथक नावालाच असून पथकातले कर्मचारी नांदेडहून ये जा करीत असल्याची माहिती आहे रात्री बे रात्री रेतीची वाहतूक होत असताना महसूलपथक मात्र गाढ झोपेत असते रेतीमाफीयांनी महसूल विभागाला हाताशी धरुन आपला व्यवसाय सूरु ठेवल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे या माफीयांना कोणीही अडवू शकत नाही कारण महसूल विभागातील काही कर्मचारी तसेच तलाठी मंडळ अधिकारी यांचेसोबत रेती माफीयांचे अर्थिक हितसंबध असल्याने अर्थिक तडजोड करुन हा प्रकार सर्रास चालू आहे. यामूळे शासनाचा लाखोंचा महसूल बूडत आहे.महसूल विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांकडून अवैद्य रेती वाहतूकीला हिरवा कंदिल मिळत असल्याने रेतीमाफीयांचे मनोबल वाढले आहे कधी दिवसा तर कधी रात्रीला सर्रास रेतीची वाहतूक होताना अढळून येते भोकरच्या महसूल विभागाने सर्व सामान्यांची कामे प्रलंबित ठेवत जो दाम देईल त्याचे काम करण्याचा सपाटा सूरु ठेवल्याचे पहावयास मिळत आहे.वरिष्ठांनी भोकर शहरात सूरु असलेल्या अवैद्य रेती वाहतूकीकडे लक्ष घालून होत असलेली अवैध रेतीची वाहतूकीला आळा घालावा व रेती माफीयांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्वस्तरातून होत आहे.

# पंचमीच्या मुहूर्तावर वरुणराजाचे वरदान; पिकांचे पुनरुज्जीवन

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२६ जुलै -**

तालुक्यामध्ये या नक्षत्रातील पाऊस हा यंदाच्या वर्षातील खरिप हंगामातील शेतातील पिकांसाठी ही एक पुनरुज्जीवनाची संधी आहे, असं मत होटाळा येथील स्थानिक शेतकरी संभाजी पा. जाधव यांनी मत व्यक्त केले आहे.

नायगांव तालुक्यांमध्ये गेल्या काही आठवड्या पासून पाऊस होत नसल्यामुळे शेतकर्यामध्ये चिंता वाढवली असतांनाच, मघा नक्षत्राच्या आगमनाने नायगांव तालुक्यात दि.२५ पासून दमदार पाऊस झाला.आणि त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामातील पिकांना नवसंजीवनी लाभली



आहे. या जोरदारपणे पडलेल्या पावसामुळे अनेक गावातील पिकं ही जोमाने बहरली असून.सध्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचं हास्य फुललं आहे.

नायगांव तालुक्यातील विशेषतः नरसी,कांडाळा,होटाळा,धानोरा,मरवाळी,मरवाळी तांडा या सह विविध गावांमध्ये कापूस, सोयाबीन, तूर यासारख्या खरीप पिकांमध्ये चांगल्या वाढीचे लक्षण दिसून येत आहेत. नरसी येथील शेतकरी मनोहर सुर्यवंशी, व काडांळा येथील शेतकरी मनोहर कदम म्हणाले, आम्हाला वाटलं होतं की पाणी नसल्यामुळे पिकं आता वाळून जातील,पण या नक्षत्रातील वेळचा पाऊस वेळेवर पडल्यामुळे. आता पिकं जोमात आली आहेत.

नायगांव कृषी विभागानेही याची पुष्टी केली असून अधिकाऱ्यांनी सांगितले की, सध्याच्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता पुढील आठवड्यातही पावसाचा जोर टिकून राहण्याची शक्यता आहे, जे पिकांच्या वाढीस अनुकूल ठरणार आहे.

# उमरी नगर परिषद स्वच्छ सर्वेक्षण मध्ये जिल्हात प्रथम

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.२६ जुलै -**

उमरी नगर परिषद स्वच्छ सर्वेक्षण २०२४ - २०२५ मध्ये जिल्हायात प्रथम क्रमांक मिळवला असून याशिवाय उमरी नगर परिषदेस जऊक्र++ पुनर्प्रमाणीत म्हणून सन्मानित करण्यात आले आहे.

हे यश साध्य करण्यासाठी योगदान देणाऱ्या उमरी नगर परिषद कर्मचारीवृंदाचे तसेच समस्त उमरीकरांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार व्यक्त करण्यात आले या यशामागे उमरी मुख्यधिकारी निलम कांबळे यांचा सिहांचा वाटा आहे . नगर परिषद उमरी यांच्या कुशल नेतृत्वाखाली राबवण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे मोलाचे योगदान आहे.

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत, स्वच्छता अभियान राबवले गेले. सार्वजनिक शौचालयांचे नुतनीकरण करून सुविधा अधिक सक्षम करण्यात आल्या. शहरातील दुभाजक सौंदर्यीकरण करुन मोठया प्रमाणामध्ये वृक्ष लागवड करण्यात आले असुन या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनालाही मोठी चालना मिळाली आहे.

शहरात 3R (Reduce, Reuse, Recycle) या तत्त्वांचा अंगीकार करत चौक सुशोभिकरण करण्यात आले, ज्यामुळे शहराच्या सौंदर्यात लक्षणीय भर पडली आहे. टाकाऊ वस्तूंमधून टिकाऊ आणि आकर्षक वस्तूंची निर्मिती करण्यात येऊन पुनर्वापराची चळवळ मजबूत करण्यात आली आहे, ज्यामुळे पर्यावरणपूरक विकासाची दिशा दाखवते.

नगर परिषद नागरिकांचा अभिप्राय संकलित करून त्यांच्या सूचनांच्या आधारे विविध सुधारणा करण्यात आले. नागरिकांमध्ये स्वच्छता, कचरा वर्गीकरण, प्लास्टिक बंदी, घरगुती कंपोस्टिंग, ई-कचरा व्यवस्थापन याबाबत व्यापक जनजागृती अभियान राबवण्यात आले.

स्वच्छता ही सेवा २०२४ उपक्रमांतर्गत एक पेड मा के नाम मोहिमेअंतर्गत शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. सफाई कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिरे घेण्यात आली, आणि दर महिन्याला उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आहे .

शाळांमध्ये स्वच्छतेबाबत विविध स्पर्धा व स्वच्छ तीर्थ अभियान अंतर्गत शहरातील सर्व तीर्थस्थळांवर विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली, ज्याने धार्मिक पर्यटनस्थळांचे देखील सौंदर्य खुलवले आहे यामध्ये उमरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी निलम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली, कार्यालयीन अधिक्षक कांचन पडलवार,स्वच्छता अभियंता विशाल बाराते, लेखापाल बालाजी चवरे, नगर अभियंता कैलाश येमेलवाड, वरिष्ठ लिपिक गणेश मदने, वरिष्ठ लिपिक सचिन गंगासागरे, संगणक अभियंता विनोद सावंत, अभियंता शकील पठाण, पिंडकुरवार एस.वाय,स्वच्छता निरिक्षक भिमराव सुर्यवंशी, मुकादम चंद्रकांत श्रीकांबळे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी पिराजी गायकवाड, नरेंद्र खंदारे, सुर्यकांत माळवतकर,रमाबाई करपे,शंकर पाटिल,पंडित जाधव, लिपिक गंगाधर पवार, लिपिक शंकर माने, आकाश खंदारे, अंकुश सवई, माधव जाधव,सुरेश मुदिराज,सदानंद गायकवाड, चंद्रप्रकाश मदने, शमीम बेग, मिलिंद सवई,दिपक पोलशेटवार, शहनाज बेग,सुनंदा खंदारे,मिरा सोनकांबळे,मिरा चौदंते,मिना लिंबे,संजय मदने,सुंदराबाई झुंजारे,अशोक वाघमारे,संतोष शेळके,बालाजी खंदारे, सुनिल गायकवाड,सुभाष सिंगरवाड, संगिता हेमके,दत्ता टेकाळे,व घनकचरा व्यवस्थापन कर्मचारी तसेच शहरातील नागरीकांचा सहभाग होता.

दररोज आपण सर्वजण मिळून उमरी शहर सर्वात स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत शहर बनवूया! असा निर्धार संदेश देण्यात आला आहे .

## जाहिर प्रगटन

विषय:मौजे लगळूद येथील गट क्र.२६२ मधील कूळाचे नाव व खंड रकान्यातील संरक्षित कूळ स.कू.आडेलू राजेन्ना दा.नि. ता((१००८९)दोन वर्षापासून बे.द.हाली कब्जेदार(१००८९)कास्त करतो५३-५४(१००८९)अशी ही नोंद कमी करणे बाबद.संदर्भ-अर्जदार गंगाधर भोजराम कदम रा.लगळूद ता.भोकर जि.नांदेड यांचा अर्ज दि.२४/०७/२०२५उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रकाचे अनूषंगाने अर्जदार गंगाधर भोजराम कदम यांनी मौ. लगळूद येथील गट क्र.२६२ कूळाचे नाव व खंड रकान्यातील संरक्षित कूळ स.कू,आडेलु राजेन्ना दा.नि. ता.(१००८९)दोन वर्षापासून बे.द.हाली कब्जेदार (१००८९)कास्त करतो ५३-५४(१००८९)अशी नोंद कमी करणे बाबत या कार्यालयास विनंती अर्ज केला आहे.याद्वारे मौ.लगळूद येथील गट क्र.२६२मधील कूळाचे नाव व खंड रकान्यातील संरक्षित कूळ स.कू.आडेलू राजेन्ना दा.नि.ता.१००८९दोन वर्षापासून बे.द.हाली कब्जेदार १००८९कास्त करतो ५३-५४(१००८९)कूळधारक अथवा त्यांचे वारसदार किंवा ईतर कोणी हितसंबधी व्यक्ती यांना कळविण्यात येते की सदर कूळ कमी करणे बाबत कोणाचे काही आक्षेप असल्यास त्यांनी आपले आक्षेप १५दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावेत मूदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.मूदतीत आक्षेपप्राप्त न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून प्रकरणात नियमानूसार पूढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार, भोकर**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अंबाजोगाईत लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीचा वाद पेटला
# नगर परिषदेसमोर मृतदेह ठेवून ठिय्या आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ जुलै**

अंबाजोगाई शहरात लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीचा वाद चिघळला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या लिंगायत समाज बांधवांनी आज रविवार रोजी अंबाजोगाई नगर परिषदेसमोर मृतदेह ठेवत ठिय्या आंदोलन छेडले.

अंबाजोगाईत गेल्या काही वर्षांपासून लिंगायत समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी मिळावी, अशी मागणी सुरू आहे. मात्र, प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी अद्याप यावर कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. परिणामी, समाजबांधवांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

आज एका समाजबांधवाच्या निधनानंतर अंत्यसंस्कारासाठी जागेचा प्रश्न निर्माण झाला. यावर उपाय न मिळाल्याने संतप्त नागरिकांनी मृतदेह थेट नगर परिषद कार्यालयासमोर आणत आंदोलन सुरू केलं. या आंदोलनामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. लिंगायत समाजाच्या बांधवांनी इशारा दिला आहे की, जर तातडीने स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल.

# चोऱ्या करणारे दोन अट्टल दरोडेखोर बीडमध्ये जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन चोरीच्या घटना जानेवारी महिन्यामध्ये झाल्या होत्या. या चोरी प्रकरणातील आरोपी बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात असल्याची गुप्त माहिती स्थानीक गुन्हे शाखेला झाल्यानंतर पोलिसांनी काल या दोन आरोपींना ताब्यात घेतले. हे दोन्ही आरोपी अट्टल गुन्हेगार असून त्यांनीनांदेड जिल्ह्यासह इतर ठिकाणी चोर्या केलेल्या आहेत.

जानेवारी महिन्यामध्ये बर्दापूर येथे तीन चोरीच्या घटना घडल्या होत्या. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल झाला होता. या चोरी प्रकरणातील आरोपी बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स येथे थांबले असल्याची गुप्त माहिती स्थानीक गुन्हे शाखेच्या पोलीसांना झाल्यानंतर पोलीस निरीक्षक बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या आरोपींना पकडण्यात आले. यामध्ये शेख इरफान मुनीर (वय ३१ वर्षे) व मुस्तफा कासीम पठाण (वय २७ वर्षे) रा. पानगाव ता.





रेणापूर जि. लातूर यांचा समावेश आहे. या दोघांना बर्दापूर पोलिसांकडे स्वाधीन करण्यात आले असून त्यांनी घरफोडी केल्याची कबुली दिली आहे. या दरोडेखोरांनी नांदेड येथे तीन, नांदेड ग्रामीणमध्ये एक, रेणापूर येथे एक आणि परळी येथे एक चोरीचा व दरोड्याचा गुन्हा केलेला आहे. सदरील ही कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, चेतना तिडके, शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धेश्वर मुरकुटे, विकास राठोड, राहुल शिंदे, नितीन वडमारे, अशफाक सय्यद, मनोज परझने, नारायण कोरडे यांनी केली.

## अट्टल गुन्हेगाराची हर्सुल कारागृहात रवानगी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी करण्याचा प्रयत्न जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत करत आहेत. आपर्यंत अनेक गुंडांनी त्यांनी हर्सुल जेलमध्ये स्थानबद्दल केले आहे. बीड शहरातील एका गुंडास जेलबंद करून त्याची हर्सुल कारागृहामध्ये पाठवून देण्यात आले आहे.




सोहेल खान समत खान (वय २७ रा.जुनी भाजी मंडई) याच्या विरूध्द अनेक गुन्हे आहेत. खुनाचा प्रयत्न, दुखापत, जिवे मारण्याची धमकी देणे यासह अन्य गुन्हे आहेत. सदरील या गुंडाविरोधात एमपीडीए कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली. त्यास पोलिसांनी पकडून हर्सुलच्या कारागृहामध्ये पाठवले आहे. सदरील ही कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शितलकुमार बल्लाळ, बाबा राठोड, सचिन अलगड, महादेव दराडे, गणपती राऊत, सिध्देश्वर मुरकुटे, अभिमन्यू अवताडे, अंकुश वरपे, युनूस बागवान, आश्पाक सय्यद, मनोज परजणे, बिभिषण चव्हाण यांनी केली आहे.

## वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम सावता महाराजांनी केले – माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

साडेसातशे वर्षापासून प्रवाहित असलेल्या वारकरी संप्रदायाने समाजातील अनेक दोष दूर केले. माणसातली जळमटे दूर केली. समाजातील जातीभेद,हिंसा, द्वेष,भेदाभेद दूर करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले असून वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम संत सावता महाराजांनी केले असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकाराम महाराजापर्यंत आणि त्यानंतरही वारकरी संप्रदायाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. सर्व संतांमध्ये श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे वारकरी संप्रदायामध्ये कार्य अधिक महत्त्वाचे आहे.

## श्री क्षेत्र रामतीर्थ मठ येथे श्रावणमासानिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

श्री क्षेत्र रामतीर्थ मठ येथे ,श्रावण मासा निमित्ताने ,विविध कार्यक्रमा चे आयोजित ,बीड प्रतिनिधी, श्री क्षेत्र दादा महाराज खडकीकर रामतीर्थ मठात, श्रावण महिन्यातील दैनंदिन कार्यक्रम खालील प्रमाणे ,सकाळी महादेव मुर्ती स अभिषेक ,७ ते ८,होमहवन नवग्रह व उमाम्हहेश्वर नामनावली ,९ते १२,नंतर आरती ,विध्यागुरू महाराज खडकीकर यांच्या मार्गदर्शना खली ,कार्यक्रम संपन्न होत आहे ,दिंनाक २ ,७,२५, पासून शिवपुराण कथा आयोजित केली आहे ,दिंनाक ८ ,७,२५, रोज सांगता ,कथाकार श्री योगेश महाराज गेवराई कर यांच्या रसाळ वाणितुन श्रवण करणार आहोत , कथचे आयोजन परीसरातील सर्व महिला मंडळ आहेत ,तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी कथेला उपस्थित राहवे ,आठ तारखेला महाप्रसाद होईल ,सगळ्या च्या वतीने ,आसे आहवान ,मठादीपती विध्यागुरू महाराज खडकीकर यांनी केले आहे

## मेडिकल–इंजिनियरिंग ची तयारी करणाऱ्या गरजु पन्नास विद्यार्थ्यांनां मोफत शिकवणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

बीड जिल्हा शैक्षणिकदृष्टया आज ही मागास आहे. उच्च शिक्षणासाठी पर जिल्ह्याचा आधार घ्यावा लागतो ही शोकांतिक आहे, जिल्ह्यात विध्यार्थीरुपी गुणरत्नांची खान आहे. माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आर्थिकदृष्ट्या शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या परंतु मेडिकल अथवा इंजिनियरिंग ची तयारी करत असलेल्या अकरावी – बारावी च्या गरजु पन्नास विद्यार्थ्यांना मोफत वर्षभर शिकवणी देणार असल्याचा उपक्रम जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जाहीर केला.

शेकडो विध्यार्थी आजही इच्छा असुन शिकवणी पासून दुर आहेत. पालकांची बेरोजगारी, आर्थिक परिस्थिती नसणे या कारणांनी पाल्याची इच्छा असूनही नीट – जेईई च्या तयारी पासून लांब आहेत. अशा गरजु पन्नास विध्यार्थ्यांना राजस्थान कोटा येथील उच्चशिक्षित व प्रदीर्घ अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शना खाली संपूर्ण वर्षभर मोफत शिकवणी दिली जाणार असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ जुलै**

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटपाचा भव्य कार्यक्रम महात्मा फुले विद्यालय माजलगाव येथे घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजक भारतीय जतनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ.प्रशांत पाटील हे होते.



या कार्यक्रमात पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक गरजू विध्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले सूत्रसंचालन हिमांशू देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजक भाजपा प्रदेश कार्यकारी सदस्य डॉ.प्रशांत पाटील यांनी केले.

या कार्यक्रमासाठी भाजपा राज्य परिषद सदस्य अरुण राऊत मा.नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके ज्ञानेश्वर मेंडके डॉ सचिन देशमुख किट्टी आडगाव मंडल अध्यक्ष रूपाली शरद कचरे पात्रुड मंडल अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके ज्ञानेश्वर सरवदे दीपक मुंडे गौरीताई देशमुख यांच्या सह महात्मा फुले शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विध्यार्थी व भारतीय जनता पक्षाचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शेवटी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री यांना सर्व विद्यार्थ्यांच्या व उपस्थितांच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## बीड येथील माँ वैष्णो पॅलेस मंगल कार्यालयात होणार
## राज्य स्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशन, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीड व महाराष्ट्र योग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ५० वी राज्यस्तरीय योगासन चॅम्पियनशिप स्पर्धा बीड येथे होत असून ही स्पर्धा बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस मंगल कार्यालय, एम आय डी सी, पेठ बीड येथे होईल असे स्पर्धा आयोजन समिती चे स्वागताध्यक्ष तथा बीड जिल्हा व्यापारी महासंघ चे जिल्हाध्यक्ष श्री संतोष (सेठ) सोहनी यांनी जाहीर केले



बीड येथे दिनांक २३ व २४ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्र राज्यस्तरीय योगासन स्पर्धा होत आहे✻ ✻महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रथम तीन क्रमांक ने जिल्हा स्तरीय स्पर्धा मधील विजेते,नामवंत योग खेळाडू या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी बीड येथे प्रथमच येत असून या स्पर्धेच्या नियोजना संदर्भात बीडमध्ये स्पर्धा नियोजन समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत आयोजन समितीचे स्वागताध्यक्ष तथा बीड जिल्हा व्यापारी महासंघ चे जिल्हाध्यक्ष श्री संतोष शेठ सोहनी यांनी ही स्पर्धा माँ वैष्णो पॅलेस मंगल कार्यालय, एम आय डी सी पेठ बीड येथे घेण्यात येईल असे स्पर्धा आयोजन समितीच्या वतीने जाहीर केले. तसेच या भव्य दिव्य स्पर्धा साठी स्वतः जागा व निवास व्यवस्था उपलब्ध करून दिली. स्पर्धा आयोजन संदर्भात ज्या अडचणी असतील त्यासाठी संपूर्ण सहकार्य राहील असे सांगितले✻

बैठकीत स्वागताध्यक्ष पदावर श्री संतोष (सेठ )सोहनी यांची निवड झाल्याबद्दल स्पर्धा आयोजन समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.✻या सत्कार वेळी बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशन चे अध्यक्ष विनायक वझे , कार्याध्यक्ष श्री प्रदीप (दादा) क्षीरसागर , कार्याध्यक्ष श्री सचिन (तात्या) ढेपे,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीडचे जिल्हाध्यक्ष विकास गवते , संयोजन समितीचे सदस्य माधव काळकुटे, अविनाश इगडे, ड गीता वझे, सुहास लोहिया, श्रीमती प्रवीणा वाघमारे ,विजय डोंगरे, विष्णू कानगावकर, बाबासाहेब कुडके, रामचंद्र ठोसर,बाळासाहेब पवार ,रामकृष्ण राऊत ,उद्धव लाड, संतोष पडोळे ,लक्ष्मण मळेकर , मच्छिंद्र बीडकर,विष्णू चौधरी ,जितेश बारसकर, बापूराव राख ,अशोक खोसे, योगेश म्हेत्रे, प्रल्हाद राजुरीकर, नितेश कठाळे उपस्थित होते.

## सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी मंत्री पंकजा मुंडे यांचा वाढदिवस
# माजलगाव भाजपा वतीने साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ जुलै**

भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने दिनांक २६ जुलै शनिवार रोजी सकाळी सात पासून ते सायंकाळी सात पर्यंत विविध सात उपक्रमानी ताईचा वाढदिवस सामाजिक धार्मिक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सकाळी सिद्धेश्वर मंदिर येथे वेद शास्त्र संपन्न ब्रह्म वृद्धांच्या मंत्रोच्चारामध्ये ताईस उत्तम आरोग्य उदंड आयुष्य लाभावे व त्यांच्या हातून अशीच अविरत सेवा कार्य घडत राहावे व त्यांची उत्तरोत्तर प्रगती व्हावी असा संकल्प करून पूजा करून आरती करून अभिष्टचिंतनाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सकाळी नऊ वाजता माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी कीट्टी आडगाव मंडळ अध्यक्षा रूपाली कचरे पाथरूड मंडळ अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके यांनी पालावरील लोकांना किराणा वाटप केल्या व अरुण राऊत यांनी पालावरील महिलांना साड्या वाटप व पर्यावरण पूरक पिशवी वितरण करण्यात आल्या. दहा वाजता महात्मा फुले शाळेत डॉ.प्रशांत पाटील यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले . आयटीआय कॉलेज येथे वृक्षारोपण हे अरुण राऊत यांनी तर मंगलनाथ मंदिर येथे ताई साहेबांच्या दीर्घायुष्यासाठी मंगल नाथाची महाआरती व मंगलनाथ मंदिर परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयात ऊसतोड मजूर महिलांच्या आरोग्याची तपासणी, विनायक रत्नपारखी यांच्या वतीने रुग्णांना फळ वाटप आणि सर्वात शेवटी आज श्रावणी पहिला शनिवार निमित्त ह्या योगा योगाने महारूद्र हनुमानाची आरती व रूपाली कचरे यांच्यावतीने राम नाम जपाच्या पुस्तकांचं वाटप या सामूहिक लेखनामधून दोन लाख ३१ हजार राम जप आदरणीय ताई साहेबांच्या दीर्घायुष्यासाठी करण्यात आले. या विविध कार्यक्रमास ज्ञानेश्वर मेंडके डॉ अशोक तिडके दीपक मुंडे सत्यनारायण उनवणे ज्ञानेश्वर सरवदे ईश्वर खुरपे अविनाश कांडुरे कैलास खुरपे पवन मोगरेकर बाळासाहेब क्षीरसागर उमेश जाधव रामेश्वर चव्हाण सुभाष कांबळे संतोष जाधव गौरी देशमुख पूजा मुंडकर चित्रा पाठक अनिता अलकुंटे, शरद कचरे दत्ता क्षिरसागर,मनोज कोरडे नामदेव मुळे राम शिंदे दत्ता महाजन नारायण मेंडके सिद्धेश्वर राठोड भरत जोशी रवी गायकवाड गंगाधरराव आगे, रामराव जाधव, विष्णू आगे कल्याण शेप, सचिन तौर, बाळासाहेब साळवे भारती घुबडे, कमलाकर जोशी , जीवन कोरडे, अशोक कीर्ते, नितीन डुकरे, दीपक गरड, ,. मनमथ लांडगे, मयूर राऊत व राजेभाऊ सरवदे यांची होती.

